पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला
• वर्ष १६ • अंक ४८ • सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ • मूल्य ५ • पृष्ठ ८
RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 ■ Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

सुख व्यक्तीचा अहंकार आणि दु:ख व्यक्तीच्या धैर्याची परीक्षा घेते.




# काळोख दाटुनी आला, तीन बाळांचा जीव गेला!

संदिप मानकर २४ ऑगस्ट

अमरावती : अमरावती जिल्हा महिला रुग्णालयाच्या नवजात शिशु अतिदक्षता विभागात सोमवारी पहाटे सुमारे ३:३० वाजता आग लागली. या दुर्घटनेत ३ नवजात बालकांचा मृत्यू झाला. सहा मुलांना पुढील उपचारांसाठी सुपर-स्पेशालिटी रुग्णालयात हलवण्यात आले. प्राथमिक माहितीनुसार, रुग्णालयाच्या तिसऱ्या मजल्यावर व्हेंटिलेटरमध्ये स्फोट झाल्यानंतर आग लागली. त्यानंतर धूर पसरला. त्यावेळी एन आय सी यु मध्ये ३९ नवजात बालकांवर उपचार सुरू होते. आग लागताच कर्तव्यावर असलेल्या डॉक्टरांनी, परिचारिकांनी आणि रुग्णालयाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ बचावकार्य सुरू केले आणि अनेक मुलांना सुरक्षित बाहेर काढले. आग लागण्याचे कारण शोधले जात आहे. या प्रकरणात दोषींवर कडक कारवाईचा आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला. त्याच बरोबर मृत बालकांच्या परिवाराला पाच लाखांची मदत मुख्यमंत्र्यांनी घोषित केली. अवघ्या वर्षभरापूर्वीच हा अद्ययावत नवजात शिशु अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला होता. इतक्या नवीन विभागात आग लागल्यानंतर रुग्णालयातील सुरक्षा आणि अग्निरोधक यंत्रणा तातडीने कार्यान्वित का झाली नाही, असा संतप्त सवाल पालक आणि नागरिकांकडून विचारला जात आहे.



## व्हेंटिलेटरच्या स्फोटाने चिमुकल्यांचा जीव गुदमरला

## ५ लाखांच्या मदतीने सरकारचे पाप धुतले जाईल का ?

### दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करणार- मुख्यमंत्री

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात काल रात्री लागलेल्या आगीत तीन बालकांचा मृत्यू झाल्याची घटना अतिशय दुःखद आणि हृदयद्रावक आहे. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. या घटनेतील दोषींवर कठोरातील कठोर कारवाई करण्यात येईल. आरोग्य मंत्री आणि सचिव दोघांनाही आजच अमरावती येथे भेट देण्यास सांगण्यात आले आहे. मृतांच्या कुटुंबीयांना राज्य सरकारकडून ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात येईल. जखमी बालकांवर उपचार शासकीय खर्चाने करण्याचे निर्देशही अमरावती जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

### सरकार प्रायश्चित्त घेणार का - सपकाळ

अमरावतीमधील हे प्रकरण कुठेतरी भ्रष्टाचाराशी निगडित आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. या घटनेचे सरकार काय प्रायश्चित्त घेणार ? असा सवाल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ही बाब अत्यंत गंभीर आहे. महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री कोण आहेत, हे आज जनतेला माहितीच नाही. देवेंद्र फडणवीस हेच राज्याचे सर्वेसर्वा असल्यामुळे त्यांनी या प्रकरणाची पूर्ण जबाबदारी स्वीकारली पाहिजे.

### राहुल गांधींना दोषी ठरवणार का ?- राऊत

संजय राऊत म्हणाले की, अमरावतीमध्ये ज्या बालकांचा मृत्यू झाला, तो राहुल गांधींमुळे झाला असे राज्याचे मुख्यमंत्री म्हणणार आहेत का? की पंडित नेहरूंमुळे झाला असे म्हणणार आहेत? असा सवाल करत, राज्यातील एकही खाते व्यवस्थित चालत नाही, असा टोला त्यांनी फडणवीस सरकारला लगावला. लोकांचे मृत्यू होत आहेत आणि तुम्ही राहुल गांधींशी स्पर्धा करत आहात; पण आता राहुल गांधी खूप पुढे निघून गेले आहेत.

### स्प्रिंकलर सुरू का झाले नाहीत?- नवनीत राणा

माजी खासदार नवनीत राणा म्हणाल्या की, रुग्णालयाला आग लागल्यानंतर तिथे बसवण्यात आलेले स्प्रिंकलर वेळेवर सुरू का झाले नाहीत? आता दुर्घटना घडल्यानंतर ते सुरू झाले आहेत, यावरून प्रशासनाचा निष्काळजीपणा दिसून येतो. एसएनसीयू कक्षातील सिलिंडर / व्हेंटिलेटर नक्की कसे आणि कशामुळे फुटले असा प्रश्न राणा यांनी विचारला.

### सरकारी रुग्णालय आहे म्हणून लक्ष नाही का ?- यशोमती ठाकूर

काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर म्हणाल्या की, सरकारी रुग्णालय आहे म्हणून त्याकडे लक्ष नाही का? खासगी रुग्णालयात कधी व्हेंटिलेटर फुटत नाहीत. ही नवीन इमारत आहे तरी सुद्धा ही घटना झाली. स्वतःचे इन्फ्रâ मॅन म्हणून कौतुक करुण घेणारे याकडे दुर्लक्ष करत आहे, असा टोला यशोमती ठाकूर यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नाव न घेता लगावला आहे.

### ही राजकारणाची वेळ नाही - प्रवीण पोटे पाटील

अतिदक्षता विभागात लागलेल्या भीषण आगीत बालकांचा झालेला दुर्दैवी मृत्यू अत्यंत वेदनादायी, मन हेलावून टाकणारा आणि तितकाच धक्कादायक आहे. या दुर्दैवी घटनेवर भाजपचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आणि विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी अतिशय संवेदनशील शब्दात तीव्र दुःख व शोक व्यक्त केला आहे.

### परिचारिकांनी भाजलेल्या हातांनी केले बचावकार्य

परिचारिकांनी माध्यमांशी संवाद साधताना म्हटले की, आम्हाला समोर फक्त लहान मुले दिसत होती. आग खूपच भीषण होती, पण आम्ही आमचे काय होईल याचा अजिबात विचार केला नाही. कक्षात ठेवण्यात आलेल्या पेटीतील बाळांना आम्ही तातडीने बाहेर काढले. आम्ही खूप प्रयत्न केले; परंतु आगीमुळे सर्वत्र प्रचंड धूर पसरला होता आणि काहीच दिसत नव्हते. त्यामुळे तीन बाळांना वाचवता आले नाही. बाळांना आगीतून बाहेर काढताना या परिचारिकांचे हात भाजले आहेत.

### प्रकरणाची चौकशी सुरु - जिल्हाधिकारी

पोलीस आणि फॉरेन्सिक टीमने घटनास्थळाची पाहणी केली आहे. उपकरणांचा पुरवठा करणाऱ्या 'शिलर' कंपनीच्या नागपूर येथील पुरवठादारांना उपकरणांच्या तांत्रिक तपासणीसाठी बोलावण्यात आले आहे.स्प्रिंकलर/फॉगर यंत्रणा का कार्यान्वित झाली नाही, तसेच फायर ऑडिटची सद्यस्थिती काय आहे, याची सखोल चौकशी केली जाईल. आरोग्यमंत्री आणि पालकमंत्र्यांना घटनेची माहिती देण्यात आली असून, आरोग्यमंत्री आज दुपारी रुग्णालयाला भेट देणार आहेत. अशी माहिती अमरावती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

### चौकशीचे आदेश दिले- चंद्रशेखर बावनकुळे

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, अमरावतीमधील आजच्या दुर्घटनेमुळे मी खूप दुःखी झालो. माझे मन हेलावून गेले आहे. दगावलेल्या नवजात बालकांना अतिशय व्यथित अंतःकरणाने श्रद्धांजली व्यक्त करतो. त्यांच्या पालकांना हे दुःख सहन करण्याची ताकद ईश्वर देवो, अशी प्रार्थना करतो. या घटनेच्या संपूर्ण चौकशीचे आदेश मी दिले आहेत. जे जखमी झाले त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना सर्व प्रकारची वैद्यकीय सहायता दिली जात असून, त्यांना लवकर आराम पडावा अशी सुविधा दिली जात आहे.




### दर्जा खराब होता असे म्हणता येणार नाही- आ. खोडके

आमदार सुलभा खोडके म्हणाल्या की, व्हेंटिलेटरचा दर्जा खराब होता असे म्हणता येणार नाही. आपण सर्व गोष्टी चेक करत घेतल्या होत्या. पण यात काय तांत्रिक बिघाड झाला हे सांगता येणार नाही, पण चौकशीमध्ये सर्व काही बाहेर येईल. आ.खोडके यांनी सकाळीच रुग्णालयात भेट देत रुग्ण नातेवाईकांचे सांत्वन केले.

## »थोडक्यात

### इम्रान खान यांना माणुसकीने वागणूक द्यावी; क्रिकेट विश्वातून मागणी



दिल्ली : पाकिस्तानचे माजी कर्णधार आणि माजी पंतप्रधान इम्रान खान यांना योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत, या मागणीसाठी जगभरातील माजी कॅप्टन मैदानात आले आहेत. टीम इंडियाचे माजी कॅप्टन सुनील गावसकर आणि कपिल देव यांच्यासह २१ माजी कर्णधारांनी पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ सरकारला पत्र लिहून, विश्वचषक विजेते कर्णधार इम्रान खान यांना योग्य वैद्यकीय उपचार मिळावेत अशी मागणी केली आहे.

---

### नाशिकमध्ये ४.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूंकप!

नाशिक : जिल्ह्यात शनिवारी रात्री सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण निर्माण झाले. गेल्या काही दिवसांपासून नाशिकच्या ग्रामीण भागात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवत होते. या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.३ असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नाशिक शहरातील सातपूर, इंदिरानगर, मेन रोड, पंचवटी, हिरावाडी आणि पाथर्डी पाडा परिसरासह शहराच्या विविध भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवल्याची माहिती समोर आली आहे.

**CLASSIFIED**

**प्रवेश देणे सुरू आहे**
आय.टी.आय.व १२ वी समकक्ष कोर्सेस
१) इलेक्ट्रीशियन २ वर्ष
(२) बांधकाम पर्यवेशक १ वर्ष प्रवेश
पात्रता १० वी, १२ वी पास / नापास, टक्कवारीची अट नाही
डायरेक्ट ऑनलाईन प्रवेश
संपर्क
स्नेहदीप व्होकेशनल ज्युनिअर कॉलेज, SBI बँकेच्या वरं, राठीनगर, अमरावती
मो. नं.- 8087958087

**शेती विकणे आहे**
मौजा चांदूर, ता. जि अकोला येथील शेत सर्व्हे नं. 188/2 आईच्या शाळेसमोर व प्रभात किड्सच्या मागील बाजूस, नगर पालिकेच्या बॉर्डरला लागून उत्तम लोकेशनचे आहे. लेआउटचे शेत 84 आर. लेआउटचे शेत विकणे आहे.
संपर्क : शरदचंद्र नेवास्कर
मो. नं.- 9822702276

# अन् बिबट्या चक्क झाडावर चढला..!

## कलगाव-सवना मार्गावरील थरार; व्हिडिओ व्हायरलने परिसरात दहशत

फिरोज पठाण २४ ऑगस्ट



**महागाव (यवतमाळ) :** रात्र शांत... रस्त्याच्या कडेला बाभळीचे झाड... आणि अचानक त्याच झाडावर चपळाईने चढणारा बिबट्या! कलगाव-सवना-पुसद मार्गावर घडलेल्या या थरारक दृश्याचा व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. बिबट्याच्या मुक्तसंचारामुळे शेतकरी व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. काळी दौलतखान वनपरिक्षेत्रातील सवना-कलगाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून बिबट्याचा वावर असल्याचे समोर येत आहे. शनिवारी रात्री पोलिस गस्तीवर असलेले बीट जमादार कैलास मोकाटे यांना बिबट्याचे दर्शन झाले. त्यानंतर परिसरातील काही नागरिकांनीही बिबट्या पाहिल्याचे सांगितले. दरम्यान, कलगाव-सवना-पुसद मार्गालगत बिबट्या बाभळीच्या झाडावर चढताना एका नागरिकाने आपल्या कॅमेऱ्यात टिपला. काही क्षणांचा हा व्हिडिओ समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित झाला असून, तो पाहून नागरिकांच्या काळजाचा ठोका चुकला आहे. कलगाव, सवना शिवारात मोठ्या प्रमाणात उसाची शेती आहे. दाट उसाच्या पिकामुळे बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळत असल्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतात काम करणारे शेतकरी आणि मजूर तसेच सकाळी किंवा रात्रीच्या वेळी रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांनी अधिक सावध राहण्याची गरज आहे. बिबट्या दिसल्यास त्याच्या जवळ जाऊ नये किंवा त्याला हुसकावण्याचा प्रयत्न करू नये.

### वन कर्मचाऱ्यांनी साधला शेतकऱ्यांशी संवाद

बिबट्याच्या वावराची माहिती मिळताच काळी दौलत खान वनपरिक्षेत्राच्या पथकाने सवना-कलगाव रस्त्यालगतच्या परिसराची पाहणी केली. वनकर्मचाऱ्यांनी शेतकरी व नागरिकांशी संवाद साधत सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी राजश्री बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली बिबट्याच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यात येत आहे.

# डॉ. हर्षदा डाळीमकर यांना पुन्हा ज्वॉईन करण्यास सकारात्मक!

## शासकीय महाविद्यालयाचे डिन डॉ.संजय सोनुने यांचे आश्वासन

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

अकोला: शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, अकोला येथील पदव्युत्तर (इउ) वैद्यकीय विद्यार्थिनी डॉ. हर्षदा डाळिमकर यांच्या प्रकरणात महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांनी महत्त्वपूर्ण माहिती दिली आहे. प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समितीच्या सदस्यांची नेमणूक करण्यात आली असून प्रश्नांची प्रश्नावली तयार करून चौकशीची सखोल प्रक्रिया लवकरच पार पडेल, असे अधिष्ठात्यांनी स्पष्ट केले. तसेच डॉ. हर्षदा डाळीमकर यांनी पुन्हा कामावर रुजू होण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्यांना तात्काळ रुजू करून घेतले जाईल. त्यांच्यावर किंवा त्यांच्या विभागात कोणताही मानसिक त्रास अथवा अडचण येणार नाही, याची संपूर्ण वैयक्तिक जबाबदारी प्रशासनाकडून घेतली जाईल, असे आश्वासन अधिष्ठात्यांनी दिले आहे. विद्यार्थिनीने राजीनामा देऊ नये, अशी प्रशासनाची भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. चौकशी समितीचा अहवाल आम्ही लवकरात लवकर देण्याचा प्रयत्न करत आहोत. आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तिला आम्ही आताही रुजू करून घ्यायला तयार आहोत. ती आली तरी विभागात काहीच प्रॉब्लेम नाही आणि आम्ही विभागातल्या सगळ्यांना सूचना दिलेल्या आहे की, ज्युनिअर चे वर्क लोड अधिक होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेश अधिष्ठाता यांनी दिले आहे. डॉ. हर्षदा जर आली किंवा तिने रुजू होतो म्हटलं तर मी पटकन तिला रुजू करून घेईन. तिच्या विभागात तिला कोणी त्रास देणार नाही, ती पर्सनल वैयक्तिक जबाबदारी आता मात्र मी स्वतः घेईन. ती शेवटी आपल्या कॉलेजची विद्यार्थिनी आहे, तिने राजीनामा देऊ नये असंच मला वाटतं, असे शासकीय वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.संजय सोनुने म्हणाले.




# नागपूरच्या गोधनी परिसरात क्लोरिन गॅसची गळती!

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**नागपूर :** नागपूरच्या गोधनी ग्रामपंचायत परिसरात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्लांटमध्ये क्लोरिन गॅसची गळती झाल्याची घटना घडली आहे. रविवारी मध्यरात्री तीनच्या सुमारास ही घटना घडल्याची माहिती आहे. घटना घडल्यानंतर या प्लांटच्या २०० मीटरपर्यंतचा परिसर रिकामा करण्यात आला आहे. तर या गॅस गळतीमुळे ४० हून अधिक लोकांना मळमळ आणि उलट्यांचा त्रास होऊ लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. तर १५ पेक्षा जास्त लोकांना श्वास घ्यायला त्रास होत असल्याने त्यांच्यावरही रुग्णालयात सध्या उपचार सुरू करण्यात आले. दुसरीकडे घटनास्थळी एनडीआरएफ पथकाकडून आणि महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून बचाव कार्य सुरू करण्यात आले आहे. सध्या परिसरात खबरदारीच्या उपाययोजना राबविण्यात येत आहे. मात्र घडलेल्या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सध्या एनडीआरएफच्या पथकाकडून स्थानिकांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना राबवली जात आहे. नागपूरच्या गोधनी नगर परिषदेच्या सेंटरल ही घटना घडली आहे. सुरूवातीला तिथल्या कर्मचाऱ्यांना गॅस गळती झाल्याचं कळालं. मात्र तोपर्यंत गॅस हळूहळू परिसरामध्ये पसरल्यामुळे प्लांट परिसरातील नागरिकांनाही त्रास व्हायला सुरुवात झाली.



# योग्य आहार देईल थायरॉईडपासून सुटका

आजकाल वजन वाढायला लागले की, डॉक्टर थायरॉईडची तपासणी करण्याचा सल्ला देतात. हो.. कारण अचानक वाढणाऱ्या वजनाच्या मुळाशी थायरॉईड असू शकते. बिघडलेल्या जीवनशैलीमुळे महिलांमध्ये याचे प्रमाण जास्त आढळते. पण घाबरु नका योग्य आहार तुमचे या आजारापासून रक्षण करु शकतो.
बरं हे थायरॉईड प्रकरण नेमकं काय आहे. थायरॉईड ही एक लहान ग्रंथी असून तिचा आकार एका फुलपाखरासारखा असतो आणि ती मानेच्या खालच्या भागात स्थित असते. तिचं मुख्य कार्य म्हणजे शरीराच्या चयापचय क्रियेचं नियंत्रण ठेवणे असते.
थायरॉईड आहे हे कसे ओळखावे. साधारणपणे थायरॉईडची लक्षणे पुढीलप्रमाणे दिसतात.
बद्धकोष्ठता (संडासला साफ होत नाही.), शरीराचं वजन कमी जास्त होत राहते, हात पाय थंड पडतात, त्वचा कोरडी पांढरी पडते, ताण तणाव वाटतो, आळशीपणा येतो, शारीरिक आणि मानसिक विकासात अडथळे, केस गळणे.
थायरॉइडचे विकार होण्याची कारणे गुंतागुंतीची असू शकतात. परंतु, काही पथ्य पाळल्यास होऊ घातलेले थायरॉइड विकार टाळता येतात. त्यासाठी आहार, व्यायाम आणि वैद्यकीय सल्ला महत्त्वाचा आहे.
चौरस आहार हा थायरॉईडला दूर ठेवण्यास महत्त्वाचा ठरतो. आयोडिन, लोह, अ जीवनसत्त्व यांचा समावेश असलेल्या पदार्थांचे सेवन हॉर्मोन्सच्या उत्पादनाला चालना देते. साखर आणि पिष्टमय पदार्थांचे मर्यादित सेवन करावे. या दोन्ही पदार्थांमुळे वजन वाढते. ज्यामुळे थायरॉइडच्या उत्पादनावर आणि अभिसरणावर परिणाम होतो.
तेल-तूप-चरबी वाढविणाऱ्या पदार्थांपासून दूर राहिल्याने हृदयविकार, डायबेटिससह हॉर्मोन्सच्या विकारांवर नियंत्रण मिळवता येतो. दररोज ३० मिनिटे व्यायाम केल्याने रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे रक्तातील थायरॉइड शरीराच्या सर्व पेशींपर्यंत पोहोचते.
अर्थातच तुम्ही विचाराल हा आजार टाळण्यासाठी काय खावे. तर
- सफरचंद खाणं हायपोथायरॉयडिज्म समस्येत फायदेशीर मानलं जातं. कारण सफरचंदात फायबर आणि क जीवनसत्वाचं प्रमाण जास्त असतं. -
बेरी गटातील फळं खावीत. स्ट्रॉबेरी खाण्याचा सल्ला दिला जातो. बेरी आणि स्ट्रॉबेरी फळांमध्ये ॲण्टिऑक्सिड्ण्टसचं प्रमाण भरपूर असतं त्याचा फायदा थायरॉइड ग्रंथीला होतो.
- संत्री खाव्यात. संत्र्यामध्ये क जीवनसत्व असतं. हायपोथायरॉयडिज्म समस्येत वजन कमी करण्यासाठी संत्री उपयुक्त ठरतात.
-
अननसात क जीवनसत्व असते. त्यामुळे अननस अवश्य खा. आहाराची पथ्यं पाळल्यास थायरॉईड मध्ये वजन नियंत्रित ठेवणे शक्य होते.
थायरॉईड ची समस्या असेल तर सोयाबीन, कोबी, ब्रोकोली, पनीर, बटर, जंक फूड, कॉफी यांचे आहारातील प्रमाण कमी करा. नियमित तपासणी करून डॉक्टरांच्या सल्ल्याने आहार, औषधे घ्यावीत.
एक नक्की जर आहार व्यवस्थित केला तर थायरॉईडपासून नक्की सुटका होऊ शकते.



# गुणकारी दालचिनी



1 दालचिनी, मिरेपुड व मध हे मिश्रण जेवल्यानंतर घेतल्यास पोट फुगत नाही व अन्नाचे नीट पचन होते. गोवरप्रतिबंधक म्हणून दालचिनी वापरली जाते.

2 थंडीमूळे डोके दुखत असेल, तर दालचिनी पाण्यात वाटुन लेप मस्तकाला लावा. वेदना कमी होतात.

3 दालचीनी व मध एकत्र करून जिथे जखम झाली आहे तिथे लावल्यास जखम बरी होते, कारण हे एंटिबॅंक्टेरिअल आहे.

4 दालचिनी पावडर , दही, केळ, लिंबाचा रस एकत्रीत करून पेस्ट चेहऱ्याला वीस मिनिटे लावून ठेवा व नंतर धूवा. रक्ताभिसरण झाल्यामूळे त्वचा चमकते व चेहरा सुंदर दिसतो.

5 एका जार मध्ये दालचिनीच्या २-३ काड्या, ऑलिव्ह ऑईल मिसळून ठेवा, चार पाच दिवसात याचा रंग तेलात उतरेल. मग रोज रात्री झोपतांना हे तेल ओठांना चोळून लावा. काही दिवसातच काळसरपणा जाऊन ओठ सुंदर लालचुटुक होतात.

6 दालचिनीची पावडर करून त्यात मध मिसळून याने हिरड्या व दात दोन्ही ठिकाणी मंजन करावे, दातदुखी, पायरिया, किड, जिंजिवाईटिस हे सर्व आजार दूर होऊन दात बळकट होतात.

7 दालचिनीच्या तेलाने दुखऱ्या जागेवर मसाज केल्यास दुःख दूर होते व शिरा मोकळ्या होतात.

8 दालचिनी च्या सेवनाने रक्तातल्या गुठळ्या तसेच अतिरिक्त चरबी वितळून रक्तप्रवाह सुरळित चालतो.

# ज्येष्ठांसाठी खास टिप्स



## पहिली सूचना:
तुम्हाला तहान लागली नसली किंवा गरज नसली तरीही नेहमी पाणी प्या,आरोग्याच्या सर्वात मोठ्या समस्या आणि त्यापैकी बहुतांश शरीरातील पाण्याच्या कमतरतेमुळे होतात.दररोज किमान 2 लिटर.

## दुसरी सूचना:
शरीराकडून जास्तीत जास्त काम करवून घ्या , शरीराची हालचाल झाली पाहिजे, जसे की चालणे,पोहणे किंवा कोणत्याही प्रकारच्या खेळाने.

## तिसरी सूचना
कमी खा.जास्त खाण्याची लालसा सोडून द्या. कारण ते कधीच चांगले आणत नाही. स्वत: ला वंचित करू नका, परंतु प्रमाण कमी करा.प्रथिने, कार्बोहायड्रेटयुक्त पदार्थ जास्त वापरा.

## चौथी सूचना:
अगदी आवश्यक असल्याशिवाय शक्यतो वाहन वापरू नका. तुम्ही कुठेही किराणा सामान घेण्यासाठी,कोणाला भेटायला किंवा काही कामासाठी जात असाल तर, पायावर चालण्याचा प्रयत्न करा.लिफ्ट,एस्केलेटर वापरण्या ऐवजी पायऱ्या चढा.

## पाचवी सूचना राग सोडा,
काळजी करणे थांबवा, गोष्टींकडे दुर्लक्ष करण्याचा प्रयत्न करा. त्रासदायक परिस्थितीत स्वत: ला गुंतवू नका, ते सर्व आरोग्य खराब करतात आणि आत्म्याचे वैभव काढून घेतात. सकारात्मक लोकांशी बोला आणि त्यांचे ऐका.

## सहावी सूचना
सर्वप्रथम पैशाची आसक्ती सोडून द्या तुमच्या आजूबाजूच्या लोकांशी संपर्क साधा, हसवा आणि बोला! पैसा जगण्यासाठी बनवला गेला आहे,पैशासाठीआयुष्य नाही.

## सातवी सूचना
स्वत:बद्दल, किंवा तुम्ही जे साध्य करू शकले नाही अशा कोणत्याही गोष्टीबद्दल किंवा ज्या गोष्टीचा तुम्ही अवलंब करू शकत नाही त्याबद्दल कोणत्याही प्रकारचे दुःख करू नका. त्याकडे दुर्लक्ष करा आणि विसरा.

## आठवी सूचना
पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता, सौंदर्य, जात आणि प्रभाव;या सगळ्या गोष्टी अहंकार वाढवतात. नम्रता ही लोकांना प्रेमाने जवळ आणते.

## नववी टीप
जर तुमचे केस पांढरे झाले असतील तर त्याचा अर्थ आयुष्याचा अंत होत नाही. ही एका चांगल्या जीवनाची सुरुवात आहे. आशावादी व्हा, स्मृतीसह जगा, प्रवास करा, आनंद घ्या. आठवणी निर्माण करा!
१०- दहावी सूचना तुमच्या लहान मुलांना प्रेमाने, सहानुभूतीने आणि आपुलकीने भेटा! काही उपहासात्मक बोलू नका! चेहऱ्यावर हसू ठेवा!तुम्ही भूतकाळात कितीही मोठे पद भूषवले असले तरी ते वर्तमानात विसरून जा आणि या सर्वांशी मिळून मिसळून रहावे.

# जिवंत काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा असलेल्या कवयित्री!



बहिणाबाई चौधरी यांची आज जयंती

बहिणाबाईंचा जन्म असोदे (जळगाव जिल्हा) या गावी झाला. हे गाव खानदेशातील जळगावापासून अंदाजे ६ कि.मी. अंतरावर आहे. त्यांचा जन्म तिथीनुसार नागपंचमीच्या दिवशी तर तारखेनुसार २४ ऑगस्ट १८८० रोजी महाजनांच्या घरी झाला. त्यांच्या आईचे नाव भिमाई व वडिलांचे नाव उखाजी महाजन होते. तीन भाऊ- घनश्याम, गणपत आणि धनाजी, तीन बहिणी- अहिल्या, सीता आणि तुळसा. वयाच्या तेराव्या वर्षी जळगावचे खंडेराव चौधरी यांचे पुत्र नथुजी चौधरी यांच्याशी बहिणाबाईंचा विवाह झाला. नथुजी आणि बहिणाबाईंना तीन अपत्ये होती- ओंकार, सोपान आणि काशी. जळगावच्या प्लेगच्या साथीत ओंकारला कायमच अपंगत्व आले. वयाच्या तिसाव्या वर्षी बहिणाबाईंना वैधव्य आले. बहिणाबाईंना लिहिता येत नव्हते, त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता कुणी लिहून न ठेवल्यामुळे काळाच्या ओघात नष्ट झाल्या. काही रचना पुत्र सोपानदेव चौधरी यांनी आणि काही त्यांच्या मावसभाऊ सखाराम पाटील यांनी विविध प्रसंगी टिपून ठेवल्या. बहिणाबाईंचा वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी जळगावात ३ डिसेंबर १९५१ रोजी मृत्यू झाला. त्या निरक्षर होत्या; तथापि त्यांच्याकडे जिवंत काव्यरचनेची निसर्गदत्त प्रतिभा होती. शेतकाम आणि घरकाम करता करता उत्स्फूर्तपणे 'लेवा गणबोली' तील ओव्या व कविता रचून गात असत. सोपानदेव चौधरी आणि त्यांचे एक आप्त ह्यांनी जमेल तेव्हा त्या वेळोवेळी कविता तेथल्या तेथे उतरून घेतल्या आणि जपल्या.
बहिणाबाईंनी ज्या वस्तूंवर काम करता करता ह्या कविता लिहिल्या आहेत. त्यातल्या काही वस्तू तसेच त्यांचे घर बहिणाबाईचा मुलगा (ओंकार चौधरी) यांच्या सुनबाई पद्माबाई पांडुरंग चौधरी (बहिणाबाईंच्या नातसून) यांनी जिवापाड जतन करून ठेवलेल्या आहेत. जळगावच्या चौधरी वाड्यातील रामपेठमधील बहिणाबाईंच्या घराचे रूपांतर 'बहिणाई स्मृती' संग्रहालयात झालेले आहे. त्याचा सांभाळ बहिणाबाई चौधरी मेमोरियल ट्रस्ट करीत आहे.
आज बहिणाबाईंच्या रोजच्या वापरातली शेतीची अवजारे, स्वंयपाकाच्या वस्तू, भांडी, पूजेचे साहित्य ह्यांची जपणूक येथे होत आहे. हा अलौकिक ठेवा पुढील पिढीला पाहता येणार आहे. अरे संसार संसार म्हणत संसारातील सुख दुःखांच्या साक्षीदार असलेल्या अनेक गोष्टी या संग्रहालयात बघायला मिळतात. हे संग्रहालय फक्त बहिणाबाईंच्या वस्तूंचे, आठवणींचेच संग्रहालय नाही तर या भागातील कृषीजन संस्कृतीत राबणाऱ्या, कष्टकरी महिलांच्या आठवणींचा, श्रमाचा हा ठेवा आहे. जळगावात जेव्हा लेखक कवी येतात तेव्हा ते आवर्जून ह्या वाड्याचे दर्शन घेतात. बहिणाबाईंच्या घराच्या उंबरठ्यावर डोकं टेकवतात, धन्य होतात आणि मनोमन बहिणाईशी नाते जोडतात. अनेक शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थींच्या सहली येथे येतात आणि येथील माहिती जाणून घेतात. त्यांच्या याच आठवणी चिरकाल टिकतील हेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाने पहावे असं हे बहिणाबाईंचे संग्रहालय आहे. आचार्य प्र. के. अत्रे यांच्यामुळे बहिणाबाईंचे विचारधन लोंकांच्या समोर आले. बहिणाबाईंच्या निधनानंतर १९५२ सालच्या दिवाळीच्या एक दिवस आधी बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव चौधरी आचार्य अत्रे यांच्याकडे काही कामानिमित्त गेले होते. त्यावेळी त्यांच्या हातात कवितांचे बाड होते.
यावेळी त्यांनी एक त्यांच्या आईची कविता त्यांना गाऊन दाखविली. 'येहरीत दोन मोटा, दोन्हीमधी पानी एक, मोट हाकलतो एक, जीव पोसतो कितीक?' ती ऐकताच आचार्य अत्रेंनी ती कवितांची चोपडी खसकन ओढून घेतली आणि आधाशासारख्या साऱ्या कविता भरभर चाळल्या आणि जोरात ओरडले, 'अहो, हे बावनकशी सोने आहे! महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे हा गुन्हा आहे. बहिणाबाईंच्या कविता सोपानदेव आणि त्यांच्या एका भावाने लिहिल्या.कारण बहिणाबाईंना लिहिता वाचता येत नव्हते. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर त्यांच्या साहित्याची विल्हेवाट लावताना त्यांना ही वही सापडली होती.
बहिणाबाई कष्टाळू होत्या. स्वतःच्या सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. दैववादापेक्षा प्रयत्नवाद श्रेष्ठ आहे, अशी त्यांची धारणा होती. त्या रडत बसल्या नाही, कि कोणाला दोष देत बसल्या नाही. उलट त्या धीराने जीवनाला सामोरे गेल्या. हेच त्यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञानचे वेगळेपण आहे. त्यांचे तत्वज्ञान हे शक्तिशाली स्त्रीचे तत्त्वज्ञान आहे. बहिणाबाई चौधरींच्या नावारूनच जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवण्यात आले आहे.
अत्रे ह्यांच्या विस्तृत प्रस्तावनेसह बहिणाबाईंची गाणी १९५२ मध्ये (दुसरी आवृत्ती १९६९) प्रकाशित झाली आणि 'धरत्रीच्या आरशामधी सरग' (स्वर्ग) पाहणाऱ्या ह्या कवयित्रीचा महाराष्ट्रास परिचय झाला. ह्या काव्यसंग्रहात बहिणाबाईंच्या फक्त ३५ कविता आहेत; परंतु कवित्वाची कोणतीच जाणीव मनात न ठेवता, केवळ सहजधर्म म्हणून रचिलेली त्यांची बरीचशी कविता वेळीच लेखननिविष्ट न झाल्याने त्यांच्याबरोबरच नाहीशी झालेली आहे. बहिणाबाईंचे हे अमोल काव्य जगासमोर आणायला आचार्य अत्रे कारणीभूत ठरले.
--------------------------------

## कवितांचे विषय
**बहिणाबाईंच्या कविता** खानदेशातील त्यांच्या मातृबोलीत, रचिलेल्या आहेत. त्यांच्या कवितांचे विषय माहेर, संसार; शेतीची साधने, कापणी, मळणी इ. कृषिजीवनातील विविध प्रसंग; अक्षय्य तृतीया, पोळा, पाडवा इत्यादी सणसोहळे; काही परिचित व्यक्ती, असे आहेत. बहिणा बाईंच्या रचनांत जागोजागी जीव जातींचा उल्लेख आलेला आहे. उदाहरणार्थ, खीरा, भीमफूल,गोंडबा, सागरगोटे, ढोर, इचू, साप, कपाशी, गाय, बोरी, बाभई, पळस, सुगरण.
-----------------------------------

## काव्य रचनेची वैशिष्ट्ये
**लेवा गणबोली (खानदेशी)** भाषेतून; अतिशय सोप्या शब्दांत जीवनाचे तत्त्वज्ञान व्यक्त करणारे हे काव्य आहे. खानदेशातील आसोदे हे बहिणाईंचे जन्मगाव. तिथला परिसर, तिथे बोलली जाणारी खानदेशी/लेवा गणबोली भाषा त्यांच्या काव्यातून जिवंत होते. त्या स्वतः शेतकरी जीवन जगत असल्याने शेती, जमीन, शेतकऱ्यांची सुख-दुःखे, त्यातले चढउतार, झाडे, प्राणी, निसर्ग - या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती असे त्यांच्या काव्यातून दिसून येते. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुखदुःखांकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्त्वज्ञान ही त्यांच्या कवित्वाची वैशिष्ट्ये होत.
'आला सास, गेला सास, जीवा तुझं रे तंतर, अरे जगनं-मरनं एका सासाचं अंतर!' किंवा 'लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते' अशा किमान शब्दात अर्थाची कमाल गाठणारे शब्द, 'अरे संसार संसार - जसा तवा चुल्यावर आधी हाताले चटके - तव्हा मीयते (मिळते) भाकर' किंवा 'देव कुठे देव कुठे - आभायाच्या आरपार देव कुठे देव कुठे - तुझ्या बुबुयामझार'. एखाद्या मोठ्या ग्रंथाचा विषय असणारे जीवनाचे तत्त्वज्ञान त्या साध्या, सोप्या, (आणि कमी) शब्दांत सहजपणे सांगून गेल्या आहेत.

# संगीत कुठल्याही नमाज किंवा प्रार्थनेपेक्षा सर्वोच्च मानणारे सनईवादक बिस्मिल्ला खान!



सनईवादक बिस्मिल्ला खान यांचा जन्म २१ मार्च १९१६ रोजी झाला तर २१ ऑगस्ट २००६ रोजी त्यांचे निधन झाले. बिस्मिल्ला खान यांच्यासाठी संगीत हेच आयुष्य होतं. संगीत, सूर आणि नमाज यांमध्ये त्यांना फरक जाणवत नसे. ते मंदिरातही शहनाई वाजवत असत. सरस्वतीचे सच्चे अनुयायी होते आणि गंगा नदीची तर त्यांना अफाट ओढ होती.
बिस्मिल्ला खान पाचवेळा नमाज पढायचे, जकात द्यायचे आणि हज यात्रेलाही जायचे. हे सांगण्याचं कारण म्हणजे, सनईवादनात ते इतके तल्लीन होत, की बऱ्याचदा नमाजही विसरून जात असत. संगीत कुठल्याही नमाज किंवा प्रार्थनेपेक्षा सर्वोच्च आहे. संगीताबद्दल त्यांचे हे आध्यात्मकि गुणच श्रोत्यांना भावत असत आणि त्यांच्याशी जोडले जात असत.बिस्मिल्लाह खान (कमरउद्दीन खान) ज्यांना अनेकदा 'उस्ताद' या उपाधीने संबोधले जाते , हे एक भारतीय संगीतकार होते ज्यांना शहनाई या रीड असलेल्या लाकडी वाद्याला लोकप्रिय करण्याचे श्रेय दिले जाते . त्यांच्या कौशल्यामुळे ते एक अग्रगण्य हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत कलाकार बनले. शहनाईला एक लोकवाद्य म्हणून महत्त्व होते, जे प्रामुख्याने पारंपरिक समारंभांमध्ये प्रशिक्षित संगीतकारांद्वारे वाजवले जात असे, परंतु खान यांनी त्याचा दर्जा उंचावला आणि त्याला मैफिलीच्या मंचावर आणले. खान एक धर्मनिष्ठ मुस्लिम होते, परंतु ते हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समारंभांमध्ये सादरीकरण करत असत आणि त्यांना धार्मिक सलोख्याचे प्रतीक मानले जात असे. त्यांच्या प्रसिद्धीमुळे, १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी दिल्लीच्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावर भारतीय ध्वज फडकावण्याच्या समारंभात सादरीकरण करण्यासाठी त्यांची निवड झाली होती. १९६६ पूर्वी खान यांनी इतर देशांमध्ये सादरीकरणाची आमंत्रणे नाकारली होती, परंतु भारत सरकारने आग्रह धरला की त्यांनी एडिनबर्ग आंतरराष्ट्रीय महोत्सवात सादरीकरण करावे . यामुळे त्यांना पश्चिमेकडील देशांमध्ये लोकप्रियता मिळाली आणि त्यानंतर त्यांनी युरोप आणि उत्तर अमेरिकेत कार्यक्रम करणे सुरू ठेवले. २००१ मध्ये, बिस्मिल्लाह खान यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान, भारतरत्न प्रदान करण्यात आला आणि २००६ मध्ये त्यांच्या निधनानंतर देशाने राष्ट्रीय शोक पाळला. एम. एस. सुब्बुलक्ष्मी आणि रवी शंकर यांच्यानंतर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित होणारे ते भारतातील तिसरे शास्त्रीय संगीतकार ठरले.बिस्मिल्लाह खान यांचा जन्म भारतातील डुमरांव या मोठ्या शहरात , पैगंबर बक्स खान आणि मिठनबाई यांचा दुसरा मुलगा म्हणून, पारंपारिक मुस्लिम संगीतकारांच्या कुटुंबात झाला. त्यांचे वडील डुमरांव राज्याचे महाराजा केशव प्रसाद सिंह यांच्या दरबारात दरबारी संगीतकार होते . त्यांचे दोन आजोबा उस्ताद सालार हुसेन खान आणि रसूल बक्स खान हे देखील डुमरांव राजवाड्यात संगीतकार होते. जन्मावेळी त्यांचे नाव कमरउद्दीन ठेवण्यात आले, जे त्यांच्या मोठ्या भावाच्या शम्सुद्दीन नावाशी जुळणारे होते. नवजात बालकाला पाहताच, त्यांचे आजोबा रसूल बख्श खान, जे स्वतः एक शहनाई वादक होते, त्यांनी 'बिस्मिल्लाह' किंवा 'अल्लाहच्या नावाने' असे उद्गार काढले आणि त्यानंतर ते उस्ताद बिस्मिल्लाह खान म्हणून ओळखले जाऊ लागले.बिस्मिल्लाह खान आपल्या कौशल्याचे श्रेय नाथांच्या ( शिवाच्या ) आशीर्वादाला देत असत आणि त्यांचा असा विश्वास होता की ते आपल्या शिष्यांना फार कमी शिकवू शकतात. खान क्वचितच विद्यार्थी स्वीकारत असत. त्यांना वाटत होते की जर त्यांनी आपले ज्ञान वाटले, तर ते उपयुक्त ठरणार नाही कारण त्यामुळे त्यांच्या विद्यार्थ्यांना फक्त थोडेच ज्ञान मिळेल. त्यांचे एक ज्येष्ठ शिष्य पंडित शैलेश भागवत आहेत, ज्यांना उस्तादजींनी स्वतः 'दुसरे बिस्मिल्लाह' म्हणून घोषित केले होते. पंडित भागवत यांनी ४० वर्षे उस्तादजींच्या तालमीत शिक्षण घेतले आहे. त्यांचे इतर काही उल्लेखनीय शिष्य म्हणजे पद्मश्री पुरस्कार विजेते पंडित एस बल्लेश भजंत्री, दक्षिण भारत बिस्मिल्ला खान आणि त्यांचा मुलगा कृष्णा बल्लेश भजंत्री, आणि खान यांचे स्वतःचे मुलगे, हुसेन आणि हुसैन नार , हुसैन आणि हुसेन नार.

## इंडिया गेटवर कार्यक्रम सादर करण्याची इच्छा राहिली अपूर्ण
१७ मार्च २००६ रोजी, बिस्मिल्लाह खान यांची प्रकृती खालावली आणि त्यांना उपचारासाठी वाराणसी येथील हेरिटेज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. इंडिया गेटवर कार्यक्रम सादर करण्याची खान यांची शेवटची इच्छा पूर्ण होऊ शकली नाही. त्यांना शहीदांना आदरांजली वाहायची होती. त्यांच्या अंतिम संस्कारांपर्यंत त्यांनी व्यर्थ वाट पाहिली. २१ ऑगस्ट २००६ रोजी, वयाच्या ९० व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. भारत सरकारने त्यांच्या निधनाबद्दल एक दिवसाचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला. भारतीय लष्कराकडून २१ तोफांची सलामी देऊन, जुन्या वाराणसीतील फातेमान दफनभूमीत एका कडुलिंबाच्या झाडाखाली शहनाईसह त्यांच्या पार्थिवावर दफनविधी करण्यात आला.

## नेहरूंच्या विनंतीवरून स्वातंत्र्य दिनी शहनाईवादन
१९४७ साली ज्यावेळी भारत स्वतंत्र झाला, त्यावेळी पंडित नेहरूंना वाटलं या क्षणी बिस्मिल्ला खान यांची सनई वाजली पाहिजे. स्वातंत्र्य दिनाच्या समारंभाच्या आयोजनाचं काम पाहणारे संयुक्त सचिव बद्रुद्दीन तैयबजी यांच्याकडे जबादारी देण्यात आली की, बिस्मिल्ला खान यांना शोधायचं Dाणि दिल्लीत कार्यक्रमसाठी आमंत्रित करायचं. बिस्मिल्ला खान त्यावेळी मुंबईत होते. त्यांना विमानाने दिल्लीत आणलं गेलं आणि सुजान सिंह पार्क येथे राजकीय पाहुणे म्हणून त्यांच्या राहण्याची सोय करण्यात आली. बिस्मिल्ला खान यांच्यावर सिनेमा बनवणाऱ्या आणि पुस्तक लिहिणाऱ्या जुही सिन्हा सांगतात, स्वातंत्र्यदिनाला सनई वाजवण्याबाबत बिस्मिल्ला खान उत्सुक होतेच. मात्र, लाल किल्ल्यावर चालत सनई वाजवू शकणार नसल्याचं त्यांनी नेहरूंना

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# अखेर 'त्या' वनमजूराचा मृत्यु

## सुसाईड नोटमध्ये चार वनअधिकाऱ्यांची नावे

प्रतिनिधी २४ ऑगस्ट



**यवतमाळ :** सामाजिक वनीकरण विभागातील वनमजुरांना कायमस्वरूपी सेवेत समावेश करावा या मागणीसाठी लढा देणा-या वनमजूर संघटनेच्या जिल्हाध्यक्षांनी यवतमाळ येथील एका लॉजमध्ये विष प्राशन केले होते. गेल्या चार दिवसापासून त्याच्यावर यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरु होते. अखेर रविवारी रात्री उपचार दरम्यान मृत्यु झाला. घटनास्थळी १२ पानांची सुसाईड नोट व विषाची बाटली आढळून आली आहे. या प्रकरणी चार जणावर कठोर कारवाई करण्याची मागणी शुक्ला याची मुलगी पलक विजय पाठक यानी केली आहे. अन्यथा मृतदेह घेण्यास नकार दिल्याचा इशारा दिला आहे.

रमाशंकर शुक्ला (रा. पुसद) असे मृतकाचे नाव आहे. पुसद येथील वनविभागात वनमजूर म्हणून कार्यरत होते. तसेच ते वनमजुर कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष होते. शासनाच्या आदेशानुसार वनमजुरांना कायमस्वरूपी सेवेत समावेश करावा या मागणीसाठी दीर्घकाळापासून लढा देत होते. या मागण्यांसंदर्भात ते १९ ऑगस्ट रोजी यवतमाळ येथील सामाजिक वनीकरण विभागाच्या अधिका-यांना भेटण्यासाठी आले होते. सायंकाळी त्यांनी यवतमाळमधील एका लॉजमध्ये मुक्काम केला व कुटुंबीयांना फोनवरून याची माहिती दिली. २० ऑगस्ट रोजी पुन्हा वनविभागाच्या कार्यालयात जाणार असल्याचे सांगून मोबाईल बंद राहील, अशी पूर्वकल्पना त्यांनी दिली होती. त्यानंतर त्यांनी लॉजमध्ये जावून विष प्राशन केले. हा प्रकार उजेडात येताच नातेवाईकांनी शुक्ला यांना शासकीय रुग्णालात दाखल केले होते. गेल्या चार दिवसापासून त्याच्यावर आयसीयुमध्ये उपचार सुरु होते. दरम्यान रविवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी मृत्यू झाला. या प्रकरणाची सखोल चौकशी करुन वनविभागातील अधिका-यांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. अन्यथा आम्ही मृतदेह घेणार नाही असा पवित्राही घेतला होता. त्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### सुसाईड नोटमध्ये वनअधिका-यांची नावे

- शुक्ला यांनी लिहिलेल्या १२ पानांच्या सुसाईड नोटमध्ये वनविभागातील चार कर्मचा-यांच्या नावांचा उल्लेख असल्याचे समोर आले आहे. "माझ्या वडिलांच्या आयुष्याचे काही बरे-वाईट झाल्यास सुसाईड नोटमध्ये नाव असलेल्या चारही कर्मचा-यांवर 'आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा' गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी," अशी मागणी शुक्ला याची मुलगी पलक पाठक यानी केली आहे.

### लॉजची खोली बंद

- २० ऑगस्ट रोजी दिवसभर फोन लागत नसल्याने कुटुंबीयांच्या सांगण्यावरून यवतमाळ येथील नातेवाईकांनी सदर लॉज गाठले. खोलीचा दरवाजा आतून बंद असल्याने आवाज दिल्याने कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता. अखेर लॉज व्यवस्थापकांनी यवतमाळ शहर पोलिसांना पाचारण केले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून खिडकीतून आत प्रवेश केला असता शुक्ला हे बेशुद्ध अवस्थेत आढळून आले. बाजूलाच विषाची बाटली व १२ पानांची सुसाईड नोट आढळून आली.

# यवतमाळचा विकास सुसाट; यंदा ८२१ कोटींचा आराखडा

प्रतिनिधी २४ ऑगस्ट




**यवतमाळ :** जिल्ह्याच्या सर्वांगिण, समावेशक व शाश्वत विकासाला गती देण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत तब्बल ८२१ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याचे नियोजन करण्यात आले आहे. यापैकी ४९२.६० कोटी रुपयांचा निधी जिल्ह्याला प्राप्त झाला आहे. विशेष म्हणजे, मागील २०२५-२६ या आर्थिक वर्षात प्राप्त झालेला संपूर्ण निधी निर्धारित उद्दिष्टानुसार १०० टक्के खर्च करण्यात प्रशासनाला यश आले आहे. जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) महत्त्वपूर्ण बैठकीत पालकमंत्री संजय राठोड यांनी हा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात पालकमंत्री संजय रा ठोड यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. बैठकीस आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, खासदार संजय देशमुख, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार धीरज लिंगाडे, आमदार दुष्यंत चतुर्वेदी, आमदार किसन वानखेडे, आमदार राजू तोडसाम, आमदार संजय देरकर, आमदार बाळासाहेब मांगुळकर यांच्यासह जिल्हाधिकारी विकास मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष धोत्रे आणि विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

**प्रलंबित कामांवरून पालकमंत्र्यांचा इशारा :** जिल्ह्यातील विकासकामांच्या संथ गतीवर आणि दर्जावर पालकमंत्र्यांनी तीव्र असंतोष व्यक्त केला. "प्रगतीपथावरील कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. कामांमध्ये हलगर्जीपणा किंवा दिरंगाई झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना थेट जबाबदार धरले जाईल," असा सज्जड इशारा त्यांनी दिला.

गेल्या वर्षीचा निधी १०० टक्के खर्च

या पुढे दर दोन महिन्यांनी डीपीसीच्या कामांचा नियमित आढावा घेतला जाईल. मुदत संपूनही कामे अपूर्ण राहिल्यास संबंधित विभागाच्या सचिवांशी थेट संपर्क साधून कारवाईची शिफारस केली जाईल. तसेच निष्काळजी अधिकाऱ्यांच्या सेवा पुस्तकात प्रतिकूल नोंद करून त्यांची वेतनवाढ रोखण्याचे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

### रस्त्यांच्या गुणवत्तेसाठी 'दक्षता पथक'

- जिल्ह्यात तयार होणाऱ्या रस्त्यांच्या गुणवत्तेबाबत अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. या पार्श्वभूमीवर रस्त्यांच्या कामांची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी व तपासणी करण्यासाठी जिल्हा नियोजन समितीचे स्वतंत्र 'दक्षता पथक' स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याशिवाय, ग्रामीण व शहरी भागातील स्मशानभूमीसाठी आवश्यक असलेली जागा एका महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

### निधी वितरणाची आकडेवारी

- जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिलेल्या माहितीनुसार, २०२५-२६ मध्ये सर्वसाधारण घटकासाठी ५२८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ८४ कोटी व आदिवासी उपयोजनेसाठी १४२.३८ कोटी असा सर्व निधी १०० टक्के खर्च झाला आहे. सन २०२६-२७ साठी मंजूर ८२१ कोटींपैकी सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि आदिवासी उपयोजनेसाठी ४९२.६० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला असून, विकासकामांना गती देण्यावर भर दिला जात आहे.

### महत्त्वाचे निर्णय :

**पिकविमा व कर्जमुक्ती :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याची रक्कम मिळण्याबाबत राज्य मंत्रिमंडळात सकारात्मक चर्चा झाली असून केंद्राकडे त्वरित प्रस्ताव पाठवला जाणार आहे. तसेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'चा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्याबद्दल आमदार किसन वानखेडे यांनी बैठकीत शासनाच्या अभिनंदनाचा ठराव मांडला.

**दहेली दुर्घटना कारवाई:** दारव्हा तालुक्यातील दहेली दुर्घटनेप्रकरणी निष्काळजीपणा करणाऱ्या जबाबदार विभाग व अधिकाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आले.

**नागरी समस्यांवर भर :** कृषी सोलर पंपांविषयीच्या तक्रारींचा आढावा जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा, तसेच शहरातील स्मार्ट मीटर, वाहतूक सिग्नल, महात्मा फुले नाट्यगृह, शिवसृष्टी आणि जलजीवन मिशनच्या कामांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.

# डोंगरखर्डा आरोग्य पथक 'सलाईन'वर; डॉक्टरांसह कर्मचा-यांची पदे प्रभारी

## आरोग्य विभागाच्या दुर्लक्षाचा नागरिकांना फटका; आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी २४ ऑगस्ट



**कळंब :** तालुक्यातील मोठे आणि आदिवासीबहुल गाव म्हणून ओळख असलेल्या डोंगरखर्डा येथील प्राथमिक आरोग्य पथकाची अवस्था सध्या बिकट झाली आहे. मागील अनेक महिन्यांपासून या आरोग्य पथकाचा कारभार प्रभारी डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या भरवशावर सुरू असल्याने परिसरातील नागरिकांना पुरेशा आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. आरोग्य विभागाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, आता आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

डोंगरखर्डा हे कळंब तालुक्यातील मोठ्या गावांपैकी एक असून, परिसरातील दहा-बारा गावांतील नागरिकांचा विविध कारणांसाठी येथे नियमित संपर्क असतो. गावात बाजारपेठ, शाळा आणि महाविद्यालये असल्याने येथे येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे या ठिकाणी सक्षम प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा ग्रामीण रुग्णालयाची सुविधा असणे गरजेचे असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

सुमारे ३० ते ४० वर्षांपूर्वी डोंगरखर्डा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी इमारत व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मात्र, काही वर्षांपूर्वी हे प्राथमिक आरोग्य केंद्र मेठीखेडा येथे हलविण्यात आले. त्यानंतर डोंगरखर्डा येथे केवळ प्राथमिक आरोग्य पथक सुरू राहिले. मात्र, या पथकाकडेही पुरेसे मनुष्यबळ नसल्याने आरोग्यसेवेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

मागील अनेक महिन्यांपासून डॉक्टर व इतर कर्मचारी प्रभारी असल्याने नियमित आरोग्य सेवा विस्कळीत झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. आरोग्य पथकाचा कारभार शिपायाच्या भरवशावर सुरू असल्याचे चित्र असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

**आंदोलनाचा इशारा :** डोंगरखर्डा येथे सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत वारंवार मागणी करूनही ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिक आता आक्रमक होण्याच्या तयारीत आहेत. आरोग्य विभागाने तातडीने डॉक्टरांसह आवश्यक कर्मचारी नियुक्त न केल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे. "लवकरात लवकर डोंगरखर्डा येथील प्राथमिक आरोग्य पथकावर डॉक्टर जाधव यांची नियुक्ती करण्यात येईल." अशी प्रतिक्रिया रामटेके, तालुका आरोग्य अधिकारी, कळंब यांनी दिली.

# आर्णी येथे शांतता समितीची बैठक

## आगामी सण उत्सव शांततेत साजरे करण्याचे आवाहन

प्रतिनिधी २४ ऑगस्ट



**आर्णी :** आगामी काळात साजरे होणारे ईद-ए-मिलाद, पोळा, गणेशोत्सव व दुर्गोत्सव हे सण उत्सव शांततेत, सलोख्याने आणि एकमेकांच्या सहकार्याने साजरे करण्याच्या उद्देशाने पोलीस स्टेशन आर्णी येथे शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत सर्व सण उत्सव सर्वधर्म समभावाच्या भावनेतून साजरे करण्यात यावेत, तसेच सणांच्या काळात कोणत्याही प्रकारचे वाद किंवा अनुचित प्रकार घडणार नाहीत, यासाठी नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवण्यासाठी नागरिकांनी प्रशासन व पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहनही करण्यात आले.

दरम्यान, बैठकीत आर्णी शहरातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेण्यात आल्या. नागरिकांनी मांडलेल्या समस्यांवर सविस्तर चर्चा करून त्यांचे निराकरण करण्याच्या दृष्टीने आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. शांतता, एकोपा आणि सामाजिक सद्भावना कायम ठेवण्यासाठी सर्व नागरिकांनी आगामी सण उत्सव उत्साहात मात्र शांततेच्या वातावरणात साजरे करावेत, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# पंधरा दिवसांच्या खंडानंतर पाऊस; पिकांना जीवदान

प्रतिनिधी २४ ऑगस्ट



**झरी-जामणी :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाच्या लपंडावामुळे चिंतेत असलेल्या शेतकऱ्यांना शनिवारच्या रात्री झालेल्या दमदार पावसाने काहीसा दिलासा मिळाला. तब्बल पंधरा दिवस पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, कापूस यासह खरीप पिकांची वाढ खुंटण्याची भीती निर्माण झाली होती. आता झालेल्या पावसामुळे पिकांना तात्पुरता आधार मिळाला असला, तरी जमिनीत पुरेसा ओलावा निर्माण होण्यासाठी आणखी जोरदार पावसाची गरज असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

जोरदार पावसाची प्रतीक्षा

तालुक्यातील बहुतांश भागात शनिवारपासून पावसाने हजेरी लावली. काही ठिकाणी दमदार सरी झाल्या, तर काही भागांत मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. पावसामुळे शेतातील पिकांना चांगला आधार मिळाला असून, शेतीची कामेही पुन्हा सुरू झाली आहेत.

सध्या तालुक्यात सोयाबीन, कापूस आणि इतर खरीप पिके वाढीच्या अवस्थेत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पहिली खत मात्रा दिली असून, दुसरी खत मात्रा देण्याची तयारी सुरू केली आहे. काही शेतकऱ्यांनी दोन खत मात्रा पूर्ण केल्या आहेत. मात्र त्यानंतर पिकांना पाण्याची प्रतीक्षा होती.

"पाऊस झाल्याने मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र जमिनीत अजून पुरेसा ओलावा निर्माण झालेला नाही. आणखी चांगला पाऊस झाला तर पिकांना त्याचा मोठा फायदा होईल," अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

पावसामुळे शेतकऱ्यांनी खत व्यवस्थापनासह अन्य शेतीच्या कामांना वेग दिला आहे. आगामी काही दिवसांत पावसाची साथ कायम राहिल्यास खरीप पिकांची स्थिती सुधारून उत्पादनाच्या आशा बळावतील, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

# ग्राहक हक्कांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

प्रतिनिधी २४ ऑगस्ट




**पुसद :** वैश्विक विकास संस्था, मुळावा आणि कंझुमर कॉर्डिनेशन कौन्सिल यांच्या संयुक्त विद्यमाने पंचकृष्ण कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात ग्राहक जाणीव जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात युवकांना ग्राहकांचे हक्क, अधिकार, जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक नागरिक हा ग्राहक असून, दैनंदिन जीवनात विविध वस्तू व सेवांचा वापर करताना ग्राहकांची विविध प्रकारे फसवणूक होण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेषतः ऑनलाइन खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये ग्राहकांची फसवणूक होण्याच्या घटना वाढत असल्याने त्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी केंद्र सरकारने केलेल्या ग्राहक संरक्षण कायदा २०१९ बाबत विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

ग्राहकांची फसवणूक झाल्यास तक्रार कुठे व कशी नोंदवावी, त्यासाठी आवश्यक संपर्क क्रमांक, हेल्पलाइन तसेच ई-मेलद्वारे तक्रार करण्याची प्रक्रिया याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये ग्राहक हक्कांविषयी जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वैश्विक विकास संस्था, मुळावाचे अध्यक्ष अजय झरकर होते. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य दीपा शिंदे आणि विभागप्रमुख साधना राठोड उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे शिवाजी आहेर, संतोष चेके आणि कृष्णा खडसे यांनी परिश्रम घेतले.

# लक्ष्मी हिंगमिरे यांचे निधन

प्रतिनिधी २४ ऑगस्ट



**उमरखेड :** तालुक्यातील विडुळ येथील लक्ष्मी नारायणआप्पा हिंगमिरे (८४) यांचे २३ ऑगस्ट २०२६ रोजी निधन झाले. लक्ष्मी हिंगमिरे या डॉ. शिवचरण नारायणआप्पा हिंगमिरे यांच्या मातोश्री होत. त्यांच्यावर विडुळ येथील मोक्षधामात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

# श्रावणात भाविकांची मांदियाळी : निसर्गरम्य केदारगुड्यात केदारेश्वराचे दर्शन

## हेमाडपंती मंदिर परिसरात पूजा-अर्चनेसह रक्तदान, अन्नदानाचे उपक्रम

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

वसंत देशमुख



**उमरखेड :** विदर्भ आणि मराठवाड्याच्या सीमेवर, डोंगररांगांच्या सानिध्यात आणि हिरवाईने नटलेल्या केदारगुडा येथील प्राचीन हेमाडपंती केदारेश्वर मंदिरात श्रावण महिन्यानिमित्त भाविकांची मोठी गर्दी होत आहे. हदगावपासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर असलेल्या या निसर्गरम्य देवस्थानाकडे विदर्भ, मराठवाड्यासह तेलंगणा, आंध्र प्रदेशातूनही भाविक दर्शनासाठी येतात.

केदारेश्वर तथा केदारनाथ बाबा म्हणून प्रसिद्ध असलेल्या या मंदिरात श्रावणातील प्रत्येक सोमवारी विशेष पूजा-अर्चा केली जाते. भाविक बेलपत्र अर्पण करून महादेवाचे दर्शन घेतात. मनोकामना पूर्ण व्हावी, यासाठी भाविकांकडून विविध धार्मिक विधी तसेच श्रमदान केले जाते.

या देवस्थानाचे वैशिष्ट्य केवळ धार्मिकतेपुरते मर्यादित नसून सामाजिक उपक्रमांमुळेही त्याची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. श्रावण महिन्यात रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. नांदेड येथील गुरुगोविंदसिंग पतपेढीच्या सहकार्याने अनेक वर्षांपासून हा उपक्रम राबविला जात आहे. महिला, युवक-युवती तसेच ज्येष्ठ नागरिकही या शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन रक्तदान करतात.

मंदिर परिसरातील वनराई हे आणखी एक आकर्षण आहे. परिसरात विविध प्रकारची झाडे, वनौषधी आणि नैसर्गिक वनस्पती आढळतात. मंदिर संस्थानच्या माध्यमातून गरजू रुग्णांना जडीबुटीच्या औषधांची सेवा केली जाते. श्रावणात भाविकांसाठी अन्नदानाचाही उपक्रम राबविला जातो. निसर्ग, अध्यात्म आणि सामाजिक सेवांचा संगम असलेल्या केदारगुडा देवस्थानाची ख्याती दिवसेंदिवस वाढत आहे. डोंगररांगांच्या कुशीत वसलेले हे देवस्थान भाविकांसाठी श्रद्धास्थान तर पर्यटकांसाठी निसर्गरम्य ठिकाण ठरत आहे.

# माणिकराव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान

प्रतिनिधी २४ ऑगस्ट




**दारव्हा :** काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा गोवा, दीव, दमण, दादरा-नगर हवेलीचे पक्ष प्रभारी, माजी मंत्री व महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी उपसभापती माणिकरावजी ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त दारव्हा तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. उपजिल्हा रुग्णालय, दारव्हा येथे गरजू रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. तसेच दारव्हा काँग्रेस भवन येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल ठाकरे, दिग्रस विधानसभा प्रभारी प्रकाश नवरंगे, दारव्हा तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष गजानन बिबेकर, सय्यद फारुख (गटनेता, नगरपरिषद दारव्हा), ज्ञानेश्वरराव बोरकर (माजी सभापती, जिल्हा परिषद यवतमाळ), मनमोहनसिंग चव्हाण (माजी जिल्हा परिषद सभापती, यवतमाळ), पंढरीनाथ सिंह (माजी जिल्हा परिषद सदस्य, यवतमाळ), अतुल राऊत (अध्यक्ष, दारव्हा तालुका युवक काँग्रेस), रामधन जाधव (अध्यक्ष, सेवादल काँग्रेस), ॲड. मनोज कावळे, अजय गाडगे (उपजिल्हाप्रमुख, उबाटा), भगवंतराव राऊत (अध्यक्ष, नेर तालुका काँग्रेस कमिटी), जाफरखान (अध्यक्ष, जिल्हा अल्पसंख्यांक विभाग, यवतमाळ), सत्यविजय गुल्हाने (अध्यक्ष, नेर शहर काँग्रेस कमिटी), विष्णू राठोड (अध्यक्ष, दिग्रस विधानसभा युवक काँग्रेस), दिवाकर इंगोले (अध्यक्ष, नेर तालुका युवक काँग्रेस) यांच्यासह काँग्रेस पक्षाचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अनिल चव्हाण, नदीम शेख, गणेश झाडे, लक्ष्मणराव खाडे, कृष्णराव जूमले, रमेशराव ठक, गणेशराव मातारमारे, विजय पाचपोर, अशोकराव जयसिंगपूरे, ज्ञानेश्वर कदम, जगन्नाथ बोरकर, जगन पाटील, सुभाषराव शेळके, मनोहरराव नवरंगे, नगरसेवक सरफराज खान, नगरसेवक नासिर, ठेकेदार नगरसेवक अजय ठाकरे, अनिल मोहिते, ज्ञानेश्वर खोडे, मसूद खान, नगरसेवक अजीम शहा, मोहम्मद अली, उत्तमराव गोमासे, कैलास कटके, सुनील तडके, बंडू सरतापे, गुलाबराव राठोड, रामभाऊ ठाकरे, ज्ञानेश्वर मिरासे, संजय उघडे, वसंतराव सवई, जाहेद खान, गुणवंतराव वानखडे, कमलकिशोर ठाकरे, निलेश बोरकर, अमोल इंजाळकर, सतीश ओले, आबाराव देशमुख, सचिन बंबल, मनोज राऊत, नंदकिशोर मल्ले, अशोक बोरचाटे, अरुण नांदेकर, अनिल महले, किसन ढेपे, प्रमोद चव्हाण, प्रवीण राऊत, इमरान खान, नईम खान, प्रशांत ठाकरे, राजू अवचट, बबलू भोयर, करण राठोड, बबलू देशमुख, बाबाराव राऊत, हेमंत भोयर, पंडित राठोड, दीपक नवरंगे, ब्रह्मा राठोड, अनिल लोथे, राजू काळे, इस्त्राएल निरबाण, राजू चवात, किशोर शेंदुरकर, मनोहर खाडे, प्रज्वल गावंडे, रवी गायनर, श्याम गावंडे, विजय गोकुळे, सतीश बागल आदी उपस्थित होते. रक्तदान शिबिरात रक्तदात्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# अमरावतीत डफरीन रुग्णालयातील दुर्घटनेनंतर खळबळ

## माजी मंत्र्यांकडून इरवीन मर्च्युरीत धाव घेत परिस्थितीची पाहणी

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** अमरावतीच्या डफरीन रुग्णालयातील एनआयसीयू (NICU) मध्ये घडलेली भीषण दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि संतापजनक आहे. या दुर्घटनेत काही निष्पाप बालकांचा मृत्यू झाल्यामुळे त्यांच्या पालकांवर व कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर इरवीन रुग्णालयातील मर्च्युरी (जिथे मृतदेह ठेवले जातात ती जागा) परिसरात मृत बालकांच्या पालकांमध्ये प्रचंड संतापाचे वातावरण असून पालक आक्रमक झाले आहेत.



याच पार्श्वभूमीवर, राज्याच्या माजी मंत्री यशोमती ठाकूर, अमरावतीचे माजी पालकमंत्री सुनील देशमुख आणि माजी महापौर विलास इंगोले यांनी तातडीने इरवीन रुग्णालयाच्या मर्च्युरीला भेट दिली. यावेळी त्यांनी हंबरडा फोडणाऱ्या पालकांशी संवाद साधून त्यांची व्यथा व वेदना समजून घेतली.

पालकांनी उपस्थित केलेल्या गंभीर प्रश्नांची दखल घेत, या संपूर्ण दुर्घटनेची उच्चस्तरीय आणि निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका नेत्यांनी मांडली. डफरीन रुग्णालयातील अग्निसुरक्षा व्यवस्था (Fire Safety), नियमित फायर ऑडिट आणि एकूणच सुरक्षेच्या उपाययोजनांचा पारदर्शक तपास करून, या निष्पाप बालकांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणतीही दयामाया न दाखवता कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दुर्दैवी बालकांच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे नेत्यांनी यावेळी प्रकर्षाने सांगितले.

# महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

## महसूलमंत्री . चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते सन्मान

**अमरावती:** महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील योगदानाबद्दल 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेचा 'एमिनेंट इंजिनियर' हा राष्ट्रीय पुरस्कार अमरावती येथे शुक्रवारी (दि. २१) राज्याचे महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनाचे अमरावती येथे शुक्रवारी (दि.२१) उद्‌घाटन झाले. या अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर विचारमंथन झाले. सायंकाळच्या सत्रात 'आयईआय'च्या वतीने जाहीर झालेला 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रवीण तायडे, 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'चे (भारत) अध्यक्ष मनिष कोठारी, पदाधिकारी आनंद जवंजाळ, राम विघे, आर. आर. तंवर, सुनील राठी आदींची उपस्थिती होती.




'अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार आणि मानवी प्रगतीचे शिलेदार आहेत. भारताच्या अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. जगातील सर्वोत्तम अभियंते भारतात आहेत. विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांची अद्भुत कार्यक्षमता ऊर्जामंत्री म्हणून काम करताना मी जवळून अनुभवली आहे. एलिफंटा बेटासारख्या दुर्गम ठिकाणी समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहोचवण्याचे अशक्यप्राय आव्हान महावितरण व महापारेषणच्या अभियंत्यांनी लिलया पेलले.

# अनिल मानकर पुनश्च राज्याचे उपाध्यक्ष; हंगामी कार्याध्यक्षपदाचीही धुरा

## लातूरच्या महाअधिवेशनात बिनविरोध निवडम; प्रलंबित मागण्यांसाठी एकजुटीचा एल्गार

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेच्या राज्यस्तरीय महाअधिवेशन व आमसभेत अमरावती विभागाचे विभागीय अध्यक्ष अनिल मानकर यांची राज्याच्या उपाध्यक्षपदी पुनश्च बिनविरोध निवड करण्यात आली. विशेष म्हणजे, त्यांच्यावर हंगामी कार्याध्यक्षपदाची अतिरिक्त जबाबदारीही सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीने राज्यातील मोटार वाहन विभागातील कर्मचारी आरटीओ संघटनेच्या नेतृत्वात अमरावती विभागाचा आवाज पुन्हा एकदा बुलंद झाला आहे.



लातूर शहरात गेल्या २२ ऑगस्ट ला नुकत्याच पार पडलेल्या या राज्यस्तरीय महाअधिवेशन व आमसभेला राज्य मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस, कर्मचाऱ्यांचे हृदय स्थान विश्वास काटकर, मोटार वाहन विभाग आरटीओ कर्मचारी संघटनेचे मावळते अध्यक्ष प्रकाश पाटील, सरचिटणीस सुरेंद्र सरतापे यांच्यासह राज्यातील विविध पदाधिकारी व संघटनात्मक नेते उपस्थित होते. राज्यभरातून मोठ्या संख्येने कर्मचारी या अधिवेशनाला उपस्थित राहिले.

महाअधिवेशनादरम्यान झालेल्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांच्या निवडीत अनिल मानकर यांच्या कार्याची दखल घेत त्यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. त्याचबरोबर संघटनेची महत्त्वाची हंगामी कार्याध्यक्षपदाची धुराही त्यांच्याकडे सोपविण्यात आली. निवडीची घोषणा होताच उपस्थित कर्मचाऱ्यांनी जल्लोष करत घोषणाबाजी करूनअनिल मानकर ( बाप्पू ) यांचे अभिनंदन केले.

"मागण्या कागदावर नाही, प्रत्यक्षात लागू झाल्याच पाहिजेत!"

निवडीनंतर बोलताना अनिल मानकर यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर आक्रमक भूमिका स्पष्ट केली. "कर्मचाऱ्यांच्या मागण्या वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवून चालणार नाही. आपल्या न्याय्य मागण्यांसाठी संपूर्ण राज्यातील कर्मचाऱ्यांनी पक्ष, गट-तट आणि वैयक्तिक मतभेद बाजूला ठेवून एकजुटीने उभे राहिले पाहिजे. मागण्या केवळ मान्य करण्याचे आश्वासन नको, तर त्या प्रत्यक्षात लागू झाल्या पाहिजेत," असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला.

ते पुढे म्हणाले, "संघटित ताकद हीच कर्मचाऱ्यांची खरी ताकद आहे. आपल्या हक्कांसाठी आता राज्यभरातील कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने एकत्र यावे. न्याय्य मागण्यांसाठी आवश्यक त्या सर्व सनदशीर मार्गाने संघर्ष करण्याची संघटनेची भूमिका कायम राहील."

मानकर यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे आगामी काळात मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांना पुन्हा एकदा राज्यस्तरावर धार मिळण्याची चिन्हे दिसत असून, त्यांच्या पुनर्निवडीकडे कर्मचारी वर्गाचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रसंतांचे विचार कृतीत आणा - डॉ. सतीश तराळ

## विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला संपन्न

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्र हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन अमरावतीचे प्रसिध्द साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळ यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून



प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृति ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. विषयाची मांडणी करतांना डॉ. सतीश तराळ म्हणाले, चारित्र्य आणि आत्मशुध्दी खूप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे आणि प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वत:चे जीवन जगणे अत्यंत कठीण आहे. आज देशामध्ये असलेली परिस्थिती बिघडत चालली असून अशा बिघडलेल्या परिस्थितीमध्ये गाव सुधारण्याचा किंवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुध्दी होय. ज्या व्यक्तींची आत्मशुध्दी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुध्द आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोकं जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुस-यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वत:ची जीवनचर्या, साधना आणि आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींमध्ये युक्ती आणि विचारचारित्र्य असणे आवश्यक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किंवा सुधारण्याचा उपदेश करुन चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वत: कृती करण्याची गरज आहे.

# भाजपा व युवा स्वाभिमान पार्टी आयोजित दहीहंडी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे राहणार उपस्थित

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** आ.रवि राणा व भाजपा नेत्या माजी खा.नवनित राणा यांच्या संकल्पनेतुन भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि.06 संप्टेबर 2026 रोजी होणाऱ्या विदर्भस्तरीय भव्य दहिहांडी स्पर्धेच्या नवाथे चौक येथील जागेची YSP मार्गदर्शक सुनिल राणा व उपमहापौर सचिन भेंडे यांनी केली पाहणी करुन घेतला आढावा घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांची राहणार गौरवशाली उपस्थिती



उपस्थित मनपा अधिकारी व वाहतुक विभागाच्या तसेच पोलीस विभागातील अधिकाऱ्यांना विदर्भस्तरीय भव्य दहिहांडी स्पर्धेदरम्यान वाहतुकीसंदर्भात योग्य नियोजन करण्याच्या सुनिल राणा यांनी दिल्या सुचना दिल्या.भारतीय जनता पार्टी व युवा स्वाभिमान पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी 9.00 वाजता पासुन नवाथे चौक येथे विदर्भस्तरीय भव्य दहिहांडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या भव्य आयोजनाच्या पार्श्वभूमीवर YSP मार्गदर्शक सुनिल राणा व अमरावती महानगरपालिकेचे उपमहापौर सचिन भेंडे यांनी नवाथे चौक येथील आयोजनस्थळाची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला. या भव्य दहिहांडी स्पर्धेला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तसेच अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखरजी बावणकुळे यांची गौरवशाली उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे या स्पर्धेचे आयोजन भव्य-दिव्य स्वरूपात करण्यासाठी आवश्यक त्या सर्व बाबींचे काटेकोर नियोजन करण्यात येत आहे. पाहणीदरम्यान उपस्थित मनपा अधिकारी व वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांशी सुनिल राणा यांनी सविस्तर चर्चा केली. दहिहांडी स्पर्धेच्या दिवशी नवाथे चौक परिसरात मोठ्या प्रमाणात नागरिक, गोविंदा पथके व वाहनांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन वाहतूक कोंडी होणार नाही, यासाठी योग्य वाहतूक नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. कार्यक्रमस्थळी येणाऱ्या नागरिकांसाठी वाहनतळाची योग्य व्यवस्था करणे, वाहतुकीचे मार्ग सुरळीत ठेवणे, आवश्यक ठिकाणी वाहतूक वळविणे, आपत्कालीन वाहनांसाठी मार्ग मोकळा ठेवणे तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याबाबतही सुनिल राणा यांनी अधिकाऱ्यांना दिशानिर्देश दिले. दहिहांडी स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांना तसेच कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांना कोणतीही गैरसोय होऊ नये, यासाठी मनपा प्रशासन, वाहतूक विभाग व आयोजकांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असेही सुनिल राणा यांनी यावेळी सांगितले. यंदाची विदर्भस्तरीय भव्य दहिहांडी स्पर्धा अमरावतीच्या सांस्कृतिक व उत्सवी परंपरेला नवे वैभव प्राप्त करून देणारी ठरणार असून, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखरजी बावणकुळे यांच्या उपस्थितीमुळे या आयोजनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

# दरोगा प्लॉट येथील रुग्णालयाची जीर्ण इमारत पाडण्याचा प्रस्ताव मंजूर

## मनपा शिक्षण सभापती अँड.प्रिती रेवने यांच्या विशेष पुढाकार

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** दरोगाप्लॉट परिसरातील नागरिकांच्या अनेक दिवसांच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे. दिनांक 20 ऑगस्ट 2026 रोजी झालेल्या अमरावती महानगरपालिकेच्या आमसभेत दरोगाप्लॉट येथील मनपाच्या जुन्या व जीर्ण झालेल्या दवाखान्याची इमारत पाडण्याबाबतचा प्रस्ताव शिक्षण सभापती व नगरसेविका अँड. प्रिती रेवणे यांनी मंजूर करून कायम करुन घेतला.

मनपाचा दवाखाना यापूर्वीच दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करण्यात आल्याने सदर इमारत वापराविना पडीक होती. जीर्ण झालेल्या या इमारतीमुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला



होता. त्यामुळे नागरिकांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून इमारत पाडण्याचा निर्णय घेण्यात आला.

या जागेचा उपयोग आता प्रभागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी करण्यात येणार असून, येथे गरजू विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज अभ्यासिका व ग्रंथालय उभारण्याचा मानस शिक्षण सभापती अँड.प्रिती रेवणे यांनी केला आहे. त्यामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, शालेय व महाविद्यालयीन अभ्यासासाठी शांत व सुविधायुक्त जागा उपलब्ध होणार आहे.

या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी युवा स्वाभिमान पक्षाच्या विशेष पुढाकारासह महानगरपालिका शिक्षण सभापती यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. नागरिकांच्या मागणीला प्राधान्य देत जीर्ण इमारतीचा योग्य उपयोग विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी करण्याचा हा निर्णय परिसरासाठी निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# दडी मारुन बसलेल्या पावसाने अखेर लावली हजेरी

## दर्यापूर अकोला मार्गावर आपातापाजवळ जोरदार पाऊस



प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अमरावती:** गेल्या अनेक दिवसापासून दडी मारून बसलेल्या पावसाने अखेर हजेरी लावली. त्यामुळे पिकांना नव संजीवनी शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. दर्यापूर अकोला मार्गावर आपातापा जवळ पावसाने जोरदार हजेरी लावली. असाच पाऊस अनेक ठिकाणी कोसळला आहे.

# लाडक्या बहिणींकडून लाडक्या भावाला राखीचा प्रेमळ संदेश!

## थिलोरीतील ३० महिलांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पोस्टाद्वारे पाठवल्या राख्या

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**दर्यापूर :** उपमुख्यमंत्री तथा शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांची राज्यभरात "लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ"अशी ओळख निर्माण झाली आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी महिलांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे राज्यातील महिलांना आर्थिक आधार मिळत असून, या योजनेअंतर्गत पात्र महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये दिले जात आहेत.

या पार्श्वभूमीवर रक्षाबंधनाच्या पवित्र सणाचे औचित्य साधत दर्यापूर तालुक्यातील थिलोरी येथील महिला बचत गटांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याप्रती आपुलकी आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी अनोखा उपक्रम राबविला आहे. गावातील महिलांनी




लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ मानत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पोस्टाद्वारे राख्या पाठविल्या आहेत.

या उपक्रमामध्ये अहिल्याबाई होळकर महिला बचत गट, जय गणेश महिला बचत गट आणि हिरामाता महिला बचत गटातील महिलांचा सहभागहोता. या विविध बचत गटांतील एकूण ३० महिलांनी रक्षाबंधनानिमित्त राख्या पोस्टाद्वारे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापर्यंत पाठविल्या.

महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेबद्दल महिलांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, रक्षाबंधनाच्या निमित्ताने बहिणींनी आपल्या लाडक्या भावाला राखी पाठवून हा सण अधिक खास बनविला आहे. थिलोरी येथील महिलांच्या या अनोख्या उपक्रमाची सध्या परिसरात चर्चा असून, रक्षाबंधनाच्या पवित्र नात्याला सामाजिक आणि भावनिक स्पर्श देणारा हा उपक्रम विशेष ठरत आहे.

# कारनामे निरनिराळे, भ्रष्टाचाराचे जाळे...

# भाडेपट्ट्यात 'प्राचार्या'चे हात काळे !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

## * संस्थाचालक, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन यांचें संगनमतात प्राचार्याचा सहभाग
## * शासनाला लूटण्याचे धोरण, शासकीय जागेवर राजस्थान शिक्षण मंडळाचे अतिक्रमण

येथील राजस्थान महाविद्यालयाने शासकीय जागेवर अतिक्रमण करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून बांधलेल्या मुलींच्या वसतीगृहाचा भाडेकरार वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या वादग्रस्त भाडेकरारात संस्थाचालक, डीन यांच्यासोबतच प्राचार्याचे सुद्धा हात काळे झाल्याची चर्चा आहे. या प्रकरणात महसूल प्रशासनाने त्वरीत कारवाई करून ती शासकीय जागा ताब्यात घ्यावी. न घेतल्यास समाजसेवी सुभाष देवढे पाटील न्यायालयात धाव घेण्याच्या तयारीत असल्याचे दिसत आहे.





येथील राजस्थान शिक्षण मंडळाने वाशीम-काटा रस्त्यावर असलेल्या जवाहर नवोदय विद्यालयाजवळ असलेल्या शासकीय जागेवर अतिक्रमण करून त्या शासकीय जागेवर संबंधित विविध कार्यालयासोबत मिलीभगत करून युजीसीच्या कोट्यवधीच्या अनुदानातून राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत बांधली. महाविद्यालयाने ज्या उद्देशाने ही ईमारत बांधली त्या अनुषंगाने 'या' वसतीगृहात आजपर्यंत एकही विद्यार्थीनी राहिली नसल्याचे वास्तव आहे. काही वर्ष 'या' ईमारतीमध्ये शासकीय कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी भाड्याने राहत असल्याची गंभीरबाब समाजसेवी सुभाष देवढे पाटील यांचे निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी या जागे संदर्भात सर्व माहिती काढली असता ही कोट्यवधीची जागा शासनाच्या मलकीची असल्याचे समजले. त्यानंतर त्यांनी तत्कालीन स्थानिक महसूल विभागाच्या अधिकाऱ्यापासून थेट मंत्रालयापर्यंत या अतिक्रमणाबाबत आवाज उठवला आहे. स्थानिक महसूल प्रशासनाने ही वादग्रस्त ईमारत न पाडता जवळपास चार वर्षापुर्वी या शासकीय जागेचा राजस्थान महाविद्यालयाच्या नावाने असलेला नमूना 'ड' रद्द केला आहे. योगायोगाने मागील वर्षापासून वाशीमला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले. या महाविद्यालयातील मुलींच्या वसतीगृहाच्या जागेसाठी 'डीन'ची शोधमोहिम सुरू झाली. या मोहिमेत डीन यांना राजस्थान महाविद्यालयाच्या मुलींच्या वसतीगृहाच्या टोलेजंग ईमारतीचा शोध लागला. नंतर राजस्थान शिक्षण मंडळाचे लालची संचालक मंडळ, वैद्यकीय महाविद्यालयाचे डीन यांच्या 'मनोमिलनातून' पुढील कार्यक्रम ठरल्याची चर्चा आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला भाडेकराराने कोणतीही जागा घ्यावयाची असेल तर त्यांना शासनाच्या नियमानुसार संबंधित जागेच्या मालकी हक्कापासून बांधकामाची मंजुरी, नमूना ड, विविध विभागाचे ना हरकत दाखले आवश्यक असतात. योगायोगाने या अतिक्रमीत जागेवर बेकायदेशीर बांधकाम केलेल्या राजस्थान महाविद्यालयाच्या वादग्रस्त मुलींच्या वसतीगृहाच्या चाव्या प्राचार्याच्या ताब्यात असल्या कारणाने या महाविद्यालयाचे कथित संचालक मंडळ, डीन यांचे मनोमिलनातून पार पडलेल्या वसतीगृहाच्या भाडेकरारात राजस्थान महाविद्यालयाने बाहेरून आयात केलेल्या प्राचार्याचे सुद्धा हात काळे झाल्याची चर्चा आहे.

येथील महसूल प्रशासनाला या प्रकरणाची सर्व माहिती असुनही शासनाच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण करून राजस्थान महाविद्यालयाने बांधकाम केलेल्या वसतीगृहाचा भाडेकरार रद्द करून त्वरीत ही शासकीय जागा शासनाच्या ताब्यात घ्यावी. कथित भाडेकरारात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर फौजदारी कारवाई करण्यासाठीही पुढाकार घेण्याची गरज आहे.

# थोडक्यात

## हराळ येथे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना शाखा स्थापन



● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

तालुक्यातील हराळ येथे प्रहार दिव्यांग क्रांती संघटना शाखा स्थापन. जिल्हाध्यक्ष मोळकर यांची प्रमुख उपस्थिती. शाखा स्थापन करण्यात आले या शाखेचे शाखाध्यक्ष अतुल जैन तर उपाध्यक्ष लोडु धांडे सचिव उत्तम मामा वाकळे सहसचिव गजानन सरकटे व इतर सदस्य व दिव्यांगण बांधव

ग्रामपंचायत सरपंच विष्णू नाना सरकटे, ग्रामपंचायत संदीप तात्या सरकटे, ग्रामपंचायत लिपिक सुरेशजी बारस्कर, शाखाअध्यक्ष अतुल जैन, लोडूजी धांडे, माजी सैनिक सुरेशजी शेंडे, गजानन किसनराव सरकटे, उत्तमराव वाकळे, गजाननराव वाघमारे, ज्ञानबा वाघमारे, संतोष वाघमारे, हराळ उपस्थित होते. ही महाराष्ट्रातील दिव्यांगांच्या अपंग व्यक्तींच्या हक्कासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी काम करणारी एक राज्यव्यापी संघटना आहे. महत्त्वाची माहिती संस्थापक: बच्चू कडू माजी राज्यमंत्री तथा आमदार प्रदेशाध्यक्ष: धर्मेंद्र सातवमुख्य उद्दिष्ट: दिव्यांगांना सहानुभूती नको तर कायदेशीर अधिकार हवेत, यावर संघटनेचा भर आहे. दिव्यांगांचे मानधन वाढवणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि त्यांच्या पुनर्वसनासाठी ही संघटना सतत लढा देते. कार्यपद्धती: राज्यभरात सर्व जिल्ह्यांमध्ये मोर्चे, आंदोलने आणि मार्गदर्शक शिबिरे घेऊन दिव्यांग बांधवांच्या न्याय मागण्या सरकार दरबारी मांडल्या जातात.

## पालकांच्या मागणीला यश चांधई जि.प.शाळेत शिक्षक रुजू !

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

मंगरूळपीर तालुक्यातील चांदई येथे गेल्या अनेक वर्षापासून शिक्षकाची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम पडत होता या साठी भाजपाचे तालुकाध्यक्ष रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी सतत पाठपुरावा केला होता.



म्हणून त्यांचे शिक्षण समिती व ग्रामस्थांकडून आभार व अभिनंदन होत आहे. : चांधई येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षकांची कमतरता असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते. या संदर्भात पालकवर्ग व ग्रामस्थांनी नवीन शिक्षकाची मागणी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेत शिक्षण समितीचे अध्यक्ष प्रेम मनिराम जाधव, उपाध्यक्ष अमोल डिगांबर हागेतसेच भारतीय जनता पार्टीचे तालुका अध्यक्ष रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी शिक्षण विभागाकडे तात्काळ पाठपुरावा केला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करून रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांशी चर्चा करून शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी केली. त्यांच्या पाठपुराव्याला तात्काळ मागणीला यश मिळाले आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार व सातत्यपूर्ण शिक्षण मिळणे हीच प्राथमिकता असून शिक्षकांअभावी एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ देणार नाही अशी प्रतिक्रिया रविंद्र नंदकिशोर ठाकरे यांनी व्यक्त केली.

### लेमन सोड्यावर नाही उत्पादन तिथी, मग एक्सपायरी कधी...

# घातक लेमन सोडा, कारवाईतून शिकावा धडा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

## *नियमाला हरताळ, कारवाईसाठी अर्थपूर्ण टाळाटाळ





जिल्ह्यातील शेलुबाजार येथे उत्पादीत होणारा कथित लेमन सोडा प्रकरण आता 'शाही' थाटात गाजत आहे. कारण या उत्पादन कंपनीचा मालक कुणीतरी 'शहा' असल्याने अन्न व औषध प्रशासन विभाग झोपेचे सोंग घेऊन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. परिणामी बाजारात विकल्या जात असलेल्या बाटलीवर उत्पादन तारीखच नाही, तर एक्सपायरी कधी ? हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ सुरू आहे. तरीही नियमाला हरताळ फासणाऱ्या कंपनीवर कारवाईसाठी टाळाटाळ केल्या जात आहे. राज्यात इतरत्र कारवाया होत असतांना शेलुबाजारच्या लेमन सोड्यावर अर्थपूर्ण दुर्लक्ष केल्या जात आहे.

शेलुबाजार येथील STRESSCURE सॉफ्ट ड्रिंक्स अँड मिनरल वॉटर प्रा.ली. कंपनीच्या लेमन सोडा बाटलीवर उत्पादन तारीख, बॅच नंबर आणि किरकोळ विक्री किंमत नसल्याचे उघड झाले आहे. सदर लेमन सोड्याच्या बाटलीवर ' SEE BOTTLER NECK/CAP असा उल्लेख आहे, मात्र त्या ठिकाणीही कोणतीही माहिती छापलेली नाही.' Best Before 3 Months from the date of mfg ' असं लिहिलं असलं तरी उत्पादन तारीखच नसल्याने एक्सपायरी कधी हे ग्राहकांना कळणार कसं ? हा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. या बाबत सिटीन्यूज सुपरफास्टने सातत्याने पाठपुरावा केला आहे.

मात्र अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम या गंभीर प्रकरणाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सर्व सामान्य नागरिक करत असून कुठतरी पाणी मुरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यानिमित्ताने अन्न सुरक्षा नियमांनुसार उत्पादन तारीख, बॅच नंबर बंधनकारक असताना अन्न व औषध प्रशासन विभाग वाशिम का गप्प आहे. हा कळीचा मुद्दा उपस्थित होत आहे. मात्र माफीयांना कारवाईची धास्ती नसल्याने अधिकाऱ्यांनी त्यांची मस्ती उतरविण्याची गरज आहे.

## दान केली दृष्टी, मृत्यूनंतरही पाहणार सृष्टी !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



मृत्यू हा जीवनाचा शेवट असला, तरी माणुसकीचा अंत होऊ नये, याचा आदर्श हिंगोली जिल्ह्यातील फाळेगाव येथील रहिवासी संदीप टोंचर यांच्या कुटुंबीयांनी घालून दिला आहे. संदीप टोंचर यांच्या निधनानंतर कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगी धैर्याने निर्णय घेत त्यांचे मरणोत्तर नेत्रदान केले. या नेत्रदानातून गरजू व्यक्तींच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश येण्याची आशा निर्माण झाली आहे.

जवळच्या व्यक्तीच्या निधनानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असताना नेत्रदानाचा निर्णय घेणे निश्चितच सोपे नसते. मात्र टोंचर कुटुंबीयांनी भावनिक दुःखावर मात करत सामाजिक बांधिलकी जपली.

जिल्हा रुग्णालयाच्या पथकाकडून नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण टोंचर कुटुंबीयांची अंतिम इच्छा जिल्हा रुग्णालयातील पथकाने पूर्ण केली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी आणि नेत्रशल्यचिकित्सक डॉ. आशिष बेदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली नेत्रदान समुपदेशक रमेश ठाकरे, नेत्रचिकित्सा अधिकारी सुधीर साळवे आणि ऋतिक भूत यांनी मरणोत्तर नेत्रदानाची प्रक्रिया पूर्ण केली.

## फार्मर ग्रूप लीग मध्ये मेडशीचा गट विजयी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते पुरस्कार



आत्मा व कृषी विभाग वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फार्मर ग्रुप लीग पुरस्कार वितरण सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

या सोहळ्यास मा दत्तात्रय भरणे कृषीमंत्री तथा पालकमंत्री वाशिम यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच मा खासदार संजय देशमुख, मा आमदार भावना गवळी, सईताई डहाके, विभागीय कृषी सहसंचालक अमरावती विभाग गणेश घोरपडे, तसेच राज्यातील विविध जिल्ह्यांतील अधिकारी उपस्थित होते.

या स्पर्धेमध्ये मध्ये ७६५ शेतकरी गटांनी सहभाग नोंदवून तब्बल १,३५,००० हून अधिक कृषीविषयक प्रक्रिया राबविल्या. या माध्यमातून शेतकऱ्यांनी हवामान अनुकूल, शाश्वत व तंत्रज्ञानाधारित शेती पद्धतींचा व्यापक अवलंब केला.

या उपक्रमातून एकूण ८,८५,१३६ गुणांची नोंद झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरिफ शाह जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वाशिम यांनी केले. सूत्रसंचालन अनिसा महाबळे प्रकल्प संचालक आत्मा वाशिम यांनी केले. तर आभार प्रदर्शन कैलास देवकर तालुका कृषी अधिकारी मालेगाव यांनी केले. यावेळी पाणी फाउंडेशन गटाच्या वतीने प्राजक्ता कुचेकर, प्रियाताई पाठक, रेणुका राठोड, छाया थोरात, विलास ढवळे, अशोक लोखंडे, रमाकांत घुगे, अजिंक्य मेडशिकर यांनी पुरस्कार स्वीकारला.

# जगण्याची कळ, महागाईची झळ !

## बांधकाम साहित्यासह जीवनावश्यक वस्तूचे दर गगनाला

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



जीवनाश्यक वस्तूचे दर गगनाला भिडले. व महागाईची आग झपाट्याने पेटत आहे. त्यामुळे महागाईची झळ अन् जीवनाची कळ होत आहे. इंधन दरवाढीने जीवनावश्यक वस्तुचे दर गंगनाला पोहोचले आहेत. गोड साखऱ्याचे भाव वाढल्याने साखर कडु लागत आहे. त्यामुळे सामान्य नागरिकांना रडू येत आहे. बांधकाम साहित्याच्या दरवाढीमुळे सर्व सामान्यांचे घराचे स्वप्ने अधुरेच राहत आहेत.

सध्या सणसुदीचे दिवस असून बाजारपेठेत सर्वच जीवनावश्यक वस्तु सह भाजीपाल्याचेही दर भरमसाठ वाढले आहेत. ग्राहकांची वर्दळ आहे. ग्राहकाच्या या उत्साहामुळे बाजारपेठ फुलल्या आहेत. शहरातील मोठ्या बाजारात सुवर्ण झळाळी असल्याचे चित्र दिसते.

### गोड साखर झाली कडू, सर्वसामान्यांना येत आहे रडू

साखरेचे भाव किलो मागे ३० रूपयाने वाढ झाली आहे. तर तेलाच्या दरात किलोमागे सरासरी ३० ते ४० रुपयांची वाढ झाली आहे. बाजारपेठेमध्ये गुळ, नारळ, हरभरा आणि तेलाची मोठी आवक झाली आहे. मात्र ग्राहकांना दरवाढीची झळ बसली आहे. जीवनावश्यक वस्तुमध्ये सरासरी ३० ते ४० टक्के वाढ झाल्यामुळे सर्वसामान्यांचे बजेट कोसळले आहे. त्यामुळे जीवन जगतांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.



घर बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या भावात दुप्पट तिप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांना घरबांधणे आवक्याच्या बाहेर झाले आहेत. २०२२ पर्यंत सर्वांना घरे देण्याचे मोदी सरकारचे आश्वासन हवेतच विगळले. इंधन दरवाढीमुळे जीवनावश्यक वस्तुत अचाणक वाढ

## शिवसेना जिल्हाप्रमुखपदासाठी रवि भांदुर्गे यांच्या नावाची मागणी

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●



शिवसेना जिल्हाप्रमुख पदासाठी माजी युवासेना जिल्हाप्रमुख रवि देवबाजी भांदुर्गे यांच्या नावाला राष्ट्रीय कामगार संघटनेने पाठिंबा दिला आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष हनुमान सोळंके यांनी रविवारी (२३ ऑगस्ट) पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना ई-मेल व फॅक्सद्वारे निवेदन पाठवून भांदुर्गे यांच्यावर जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी सोपविण्याची मागणी केली.

भांदुर्गे यांनी युवासेना जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना जिल्ह्यात पक्षसंघटन वाढविण्यासाठी पुढाकार घेतला असून युवकांना शिवसेनेसोबत जोडले. विविध प्रश्नांवर आंदोलने करून त्यांनी सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा विचार करून जिल्हाप्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविल्यास जिल्ह्यात पक्षाचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास सोळंके यांनी व्यक्त केला आहे.

# श्रावणात जटाशंकरच्या स्वयंभू शिवलिंगाचे भाविकांना आकर्षण

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**संग्रामपूर :** अधिक मासातील श्रावणाचा दुसरा सोमवार असल्याने संग्रामपूर तालुक्यातील सातपुडा पर्वतरांगेतील निसर्गरम्य जटाशंकर येथे भगवान महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी असते. अंबाबरवा अभयारण्याच्या बफर क्षेत्रात असलेल्या जटाशंकर येथे प्राचीन स्वयंभू शिवलिंग आणि मनोहारी धबधबा हे प्रमुख आकर्षण आहे. श्रावण सोमवारनिमित्त महाराष्ट्राच्या सीमावर्ती भागासह मध्य प्रदेश व इतर राज्यांतील

## दर्शनासह पर्यटनासाठी होतेय नागरिकांची गर्दी



### वन्यजीव विभागाचा बंदोबस्त !

» जटाशंकर येथील यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोनाळा परिक्षेत्र कार्यालय (वन्यजीव) यांच्याकडून बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. वन्यजीव विभागाचे चार वनपाल, १६ वनरक्षक आणि ३० वनमजूर तैनात करण्यात आले आहेत. तसेच सोनाळा पोलिसांकडूनही बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

भाविक येथे दर्शनासाठी येत आहेत.दोन पर्वतांच्या मध्यभागी वसलेल्या जटाशंकरचे धार्मिक महत्त्वासोबतच निसर्गसौंदर्यही पर्यटकांना आकर्षित करते. पर्वताच्या गाभाऱ्यात असलेल्या स्वयंभू शिवलिंगावर धबधब्याचा पाण्याचा प्रवाह पडतो. भगवान शंकराच्या जटेतून गंगा प्रवाहित होत असल्याच्या धार्मिक संकल्पनेशी या धबधब्याचे साधर्म्य असल्याने या ठिकाणाला 'जटाशंकर' नाव पडल्याची आख्यायिका सांगितली जाते. पावसाळ्यात सातपुडा पर्वतरांग हिरवाईने नटली आहे.

# धोकादायक पुलावर उंच भराव टाकूनही दुचाकीस्वार जुमानेना

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**खामगाव :** शर्मा टर्निंगवरील मोडकळीस आलेल्या इंग्रजकालीन पुलावरील वाहतूक बंद करण्यासाठी प्रशासनाने पुन्हा मातीचा उंच भराव टाकला आहे. भरावही काही दुचाकीस्वारांसाठी अडथळा ठरत नसल्याचे चित्र आहे. धोका पत्करून काही दुचाकीस्वार भरावावरून वाहने नेत असल्याचे 'च्या पाहणीत समोर आले आहे. त्यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला आहे.

उंच जुना पूल सध्या मोडकळीस आला असून, पुलाची सुरक्षितता धोक्यात आली असून, मागील काही दिवसांपासून या मार्गावरीलवाहतूक रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने पुलाच्या एका बाजूने मातीचा भराव टाकण्यात आला होता. मात्र, भरावाच्या एका बाजूने दुचाकी जाण्यासाठी छोटी वाट तयार झाल्याने काही दिवसांपासून मार्गावरून दुचाकींची ये-जा सुरूच होती. त्यामुळे प्रशासनाने चार दिवसांपूर्वी पुन्हा या ठिकाणी



उंच मातीचा भराव टाकला.

**पुलाची अवस्था धोकादायक**

१ या पुलाचा एका बाजूचा पिलर तुटलेला असल्याने पुलाची सुरक्षितता धोक्यात आली आहे. त्यामुळे प्रशासनाने या मार्गावरील वाहतूक बंद केली आहे. वाहतूक रोखण्यासाठी ३ टाकलेल्या मातीच्या भरावावरूनही दुचाकींची ये-जा सुरू आहे. पुलाची सद्यस्थिती लक्षात घेता हा मार्ग वापरणे वाहनचालकांसाठी

**कायमस्वरूपी प्रतिबंधक उपायांची गरज**

मातीचा भराव टाकून पुलावरील वाहतूक रोखण्याचा प्रयत्न केला जात आहे; मात्र दुचाकीस्वारांकडून भरावावरून वाट काढली जात असल्याने हा उपाय प्रभावी ठरत नसल्याचे दिसते. दुचाकींच्या सततच्या वाहतुकीमुळे भरावाचा काही भाग पुन्हा खचल्यास मार्ग अधिक धोकादायक होऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने या ठिकाणी कायमस्वरूपी प्रतिबंधक व्यवस्था उभारून पुलावरील वाहतूक पूर्णपणे बंद करावी, अशी अपेक्षा आहे.

# सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थ विक्री प्रकरणी गुन्हा दाखल

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**मलकापुर :** शहरातील म्युनिसिपल शाळेसमोर सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर २२ ऑगस्ट रोजी मलकापूर शहर पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख रफिक शेख रशीद (वय २९) रा.जमीलशहापुरा पारपेठ मलकापूर याच्यावर पोलिसांनी पंचांसमक्ष छापा टाकला. यावेळी त्याच्या ताब्यातून गुलाब तंबाखूचे १९ नग किंमत ९५ रुपये, गाय छाप तंबाखूचे ९ नग ९० रुपये आणि उंट बिडीचे १० नग ११० रुपये असा एकूण २९५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल संतोष त्र्यंबक कुमावत यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अप क्र.६१६/२०२६, कलम ६ व २४, सिगारेट आणि इतर तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियम) अधिनियम २००३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोहेका चंद्रकांत शिंदे करीत आहेत.

# बुलढाणा येथे युवा महोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

बुलढाणा : द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास संस्था संचालित श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी, बुलढाणा येथे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या युवा महोत्सव २०२६-२७ चे आयोजन करण्यात येणार आहे.

विद्यापीठाने या प्रतिष्ठेच्या युवा महोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगवश्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ फार्मसी यांच्याकडे संयुक्तरीत्या सोपविली

आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना, सर्जनशीलतेला, नेतृत्वगुणांना आणि सुप्त प्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध करून देणारा विद्यापीठाचा युवा महोत्सव हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा उपक्रम मानला जातो. विद्यापीठाने दाखविलेला विश्वास, संस्थेचे मार्गदर्शन आणि सहकार्य यामुळे ही जबाबदारी अधिक सक्षमपणे पार पाडण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. या आयोजनामागे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी आमदार धृपतराव सावळे यांची प्रेरणा व मार्गदर्शन लाभत असून, संस्थेच्या सहसचिव कीर्तीताई पहाड यांच्या मार्गदर्शनाखाली युवा महोत्सवाच्या आयोजनाची तयारी सुरु आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय बोरकर यांच्या नेतृत्वात महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी युवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने कार्यरत राहणार आहेत. युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. प्रमोद काटकर, प्रा. मोहसीन खान, प्रा. पवन जगताप आणि प्रा. सुजित पाटील यांच्यावर महोत्सवाच्या समन्वयक पदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना नवे आकाश देणारा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारा हा युवा महोत्सव बुलढाणा जिल्ह्याच्या शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रासाठी निश्चितच गौरवाची पर्वणी ठरेल, असा विश्वास महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

# मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविणाऱ्या विरुद्ध शहर पो.स्टेत गुन्हा दाखल

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**मलकापुर :** शहरातील हनुमान चौक परिसरात दारूच्या नशेत दुचाकी अनियंत्रितपणे चालविणाऱ्या एका व्यक्तीविरुध्द मलकापूर शहर पोलिसांनी २२ ऑगस्ट रोजी कारवाई केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मारोती निनाजी गवर (वय ३५) रा.बेलाड ता. मलकापूर हा होंडा फॅशन प्रो मोटारसायकल क्रमांक एमएच १९ एएल ५९२६ दुचाकी रस्त्यावर वाकडी-तिकडी व अनियंत्रित पध्दतीने चालविताना आढळून आला. त्याची वैद्यकीय तपासणी केली असता तो दारूच्या नशेत असल्याचा वैद्यकीय अधिकाऱ्यांनी अभिप्राय दिला. या प्रकरणी पो.कॉ कैलास शिवाजी सोनुने यांनी दिलेल्या लेखी फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला अप.नं. ६१७/२०२६, कलम १८५ मोटार वाहन अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास स.फौ शाम सिरसाठ हे करीत आहेत.

# आपले सरकार सेवा केंद्र अर्जासाठी पोलीस व्हेरिफिकेशनची अट वेबसाईट बंद

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**चिखली :** बुलढाणा जिल्ह्यात आधार व इतर नागरिक सेवा पुरवण्यासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' सुरू करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने जाहिरात प्रसिद्ध केली असून अर्ज मागवले आहेत. मात्र, या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र मिळवण्यात तांत्रिक अडचणी येत असल्याने शेकडो अर्जदार अडचणीत सापडले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सूचनेनुसार, बुलढाणा

जिल्ह्यातील ३२० ग्रामपंचायत आणि ३२ नगरपालिका / नगरपंचायत क्षेत्रात मिळून एकूण ३५२ नवीन आपले सरकार सेवा केंद्र आयडी प्रदान करण्यासाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. या अर्जासोबत चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र (पोलीस व्हेरिफिकेशन) जोडणे अनिवार्य करण्यात आले आहे. मात्र, गेल्या २-३ दिवसांपासून पोलीस व्हेरिफिकेशनचे संकेतस्थळ तांत्रिक अडचणीमुळे बंद आहे. त्यामुळे उमेदवारांना ऑनलाईन अर्ज करता येत नाही व प्रमाणपत्र वेळेत मिळणे अशक्य झाले आहे. अर्जाची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ जवळ आली असताना, पोलीस व्हेरिफिकेशन संकेतस्थळ बंद असल्याने अनेक पात्र उमेदवार अर्ज भरण्यापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे, प्रशासनाने त्वरित दखल घेऊन पोलीस व्हेरिफिकेशन संकेतस्थळ तात्काळ पूर्ववत करावे. तांत्रिक अडचण लक्षात घेता 'आपले सरकार सेवा केंद्र' अर्जाची अंतिम मुदत वाढवून द्यावी, अशी जोरदार मागणी जिल्ह्यातील उत्सुक अर्जदार नागरिकांकडून केली जात आहे.

# राजेंद्र बघे यांच्या मध्यस्थीने तरोडा कसबा टोलनाक्यावरील काम बंद आंदोलन स्थगित

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**खामगाव :** तरोडा कसबा टोलनाक्याअंतर्गत कार्यरत मेंटेनन्स मजूर कामगारांच्या विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सुरू करण्यात आलेले काम बंद आंदोलन दि. २३ ऑगस्ट रोजी शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांच्या यशस्वी मध्यस्थीने स्थगित करण्यात आले. बघे यांनी मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्टर राजेश हबीब यांच्याशी चर्चा करून कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढला. तरोडा कसबा टोलनाक्याअंतर्गत मेंटेनन्सचे काम करणाऱ्या मजूर कामगारांना वेतनवाढ देण्यात यावी, कामगारांचा विमा काढण्यात यावा,तसेच वेतन दरमहा कामगारांच्या बँक खात्यावर जमा



करण्यात यावे,अशा प्रमुख मागण्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आल्या होत्या. याबाबत संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी खामगाव तहसीलदारांना निवेदन देऊन काम बंद आंदोलन सुरू केले होते. दरम्यान, आंदोलनाची दखल घेत शिवसेना तालुकाप्रमुख राजेंद्र बघे यांनी मेंटेनन्स कॉन्ट्रॅक्टर राजेश हबीब यांच्याशी संपर्क साधून कामगारांच्या मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली.चर्चेतून कामगारांच्या प्रमुख मागण्या पूर्ण करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेण्यात आली. त्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सुरू असलेले काम बंद आंदोलन स्थगित करण्यात आले.

शिवसेनेचे वतीने देवेश लोखंडकार, शिवसेना उप तालुकाप्रमुख गोपाल भिल, विभाग प्रमुख चेतन शलकर, विभागप्रमुख आकाश माने,पोलीस विभागाच्या वतीने जाधव साहेब व कर्मचारी उपस्थित होते. या आंदोलनाचे नेतृत्व स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांनी केले. यावेळी जिल्हा संपर्कप्रमुख योगेश घोंगे, अविनाश कोकाटे, भगवान भोपळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व मेंटेनन्स कामगार देवानंद तायडे,गजानन तुळशीराम हिंगने,रामेश्वर सुनील सिंग पवार,संदिप देवीदास कोरडे, सुभाष भास्कर मोरे,कौतिकराव खंडारे,प्रकाश काटे,अंबादास कवळकार,सुरेश तेलगोटे,दिपक खंडारे, शंकर घोंगे,समाधान कवळकार,संदिप काळे,केशव भालटिळक,गजानन पेसोड,रोशन गुर्दे,शुभम गुर्दे उपस्थित होते. कामगारांना योग्य वेतन, विमा संरक्षण आणि नियमित वेतन मिळावे, या मागण्यांसाठी संघटनेने भूमिका घेतली होती.राजेंद्र बघे यांच्या मध्यस्थीमुळे आंदोलनावर सकारात्मक तोडगा निघाल्याने कामगारांना दिलासा मिळाला आहे.

# फलाट सोडून बाजूला उभ्या राहतात बसेस; प्रवाशांची गैरसोय

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**खामगाव :** येथील बसस्थानकात काही मार्गावरील एसटी बसेस निर्धारित फलाटावर न लागता स्थानक परिसरात बाजूला उभ्या केल्या जात असल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत आहे. बस कोणत्या ठिकाणी लागणार, याबाबत स्पष्टता नसल्याने प्रवाशांना बस शोधण्यासाठी धावपळ करावी लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले आणि सामानासह प्रवास करणाऱ्या प्रवाशांना याचा अधिक त्रास सहन करावा लागत आहे. बस स्थानकावर प्रवाशांच्या सोयीसाठी विविध फलाट निश्चित करण्यात आले आहेत. संबंधित मार्गावरील बस ठरावीक





फलाटावर लागल्यास प्रवाशांना बसची प्रतीक्षा करणे तसेच बसमध्ये चढणे-उतरणे सुलभ होते; मात्र काही बसेस फलाटावर न लागता बाजूच्या मोकळ्या परिसरात उभ्या केल्या जात असल्याने व्यवस्था विस्कळीत होत आहे. स्थानकाच्या आवारात बसेसची वर्दळ मोठी असते. अशा परिस्थितीत फलाटाऐवजी बाजूला बस उभी राहत असल्याने प्रवाशांना गर्दीतून बसपर्यंत जावे लागते.

**सुरक्षिततेचा प्रश्न**

बस शोधण्यासाठी धावपळ करताना ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. प्रथमच स्थानकात येणाऱ्या प्रवाशांना बस नेमकी कुठे उभी आहे, याची माहिती मिळविण्यासाठी कर्मचाऱ्यांकडे चौकशी करावी लागते. निर्धारित फलाटावरच बसेस उभ्या राहतील, याची दक्षता घेतल्यास प्रवाशांची धावपळ कमी होऊ शकते.

**ग्रामीण बसेस कुठेही उभ्या !**

ग्रामीण भागातील काही बसेस निर्धारित फलाटावर न लागता उपलब्ध जागेनुसार कुठेही उभ्या केल्या जात असल्याचे चित्र आहे. त्यामुळे संबंधित मार्गावरील बस नेमकी कुठे लागणार, याबाबत प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होतो. विशेषतः ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या प्रवाशांना बस शोधण्यासाठी स्थानक परिसरात फिरावे लागते.

**गर्दीच्या वेळी गोंधळ**

सकाळी आणि सायंकाळच्या गर्दीच्या वेळेत बस स्थानकात प्रवाशांची मोठी वर्दळ असते.

# खामगाव येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव उत्साहात संपन्न

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**खामगाव :** महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), बुलढाणा, कृषी विज्ञान केंद्र, जळगाव जामोद आणि रोटरी क्लब, खामगाव यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी सभागृह, खामगाव येथे जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाचे उद्घाटन खामगावच्या नगराध्यक्षा श्रीमती अपर्णाताई सागर फुंडकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. संतोष डाबरे, कृषी विज्ञान केंद्र, जळगाव जामोदचे प्रमुख डॉ. विकास जाधव, रोटरी क्लबचे रो. श्री. समीर संचेती, रो. श्री. विनायक सावजी, रो. श्री. विनीत लोडाया, श्री. दीपक बुटे, नगरसेविका नीलिमाताई ढोरे, प्रमोद अग्रवाल, श्री. शर्मा यांच्यासह शेतकरी, महिला शेतकरी गट, आदिवासी बांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा श्रीमती अपर्णाताई फुंडकर म्हणाल्या की, रानभाज्या म्हणजे आपल्या आजी-आजोबांच्या काळापासून चालत आलेला पारंपरिक आहाराचा ठेवा आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला ग्रामीण भागातील कुटुंबांमध्ये विविध प्रकारच्या रानभाज्या आवर्जून तयार केल्या जात असत. या भाज्यांमधून शरीराला आवश्यक असणारे विविध पोषक घटक मिळत असल्याने पारंपरिक आहारपद्धतीचे महत्त्व आजही कायम आहे. सध्याच्या फास्ट फूडच्या युगात नव्या पिढीला रानभाज्यांची ओळख करून देणे गरजेचे असून, प्रत्येक कुटुंबाने वर्षातून किमान एकदा तरी रानभाज्यांचा आस्वाद घ्यावा, असे



आवाहन त्यांनी केले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. संतोष डाबरे यांनी प्रास्ताविकातून रानभाज्यांचे ग्रामीण अर्थव्यवस्था, आदिवासी शेतकरी आणि पारंपरिक शेतीशी असलेले नाते स्पष्ट केले. कृषी विभागाच्या वतीने दरवर्षी रानभाज्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण व आदिवासी भागातील पारंपरिक ज्ञान शहरी नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असून, महिला भगिनींनी रानभाज्यांची योग्य पद्धतीने निवड, स्वच्छता व पाककृती शिकून आपल्या कुटुंबाच्या आहारात त्यांचा समावेश करावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. विकास जाधव यांनी रानभाज्यांचे आहारातील महत्त्व स्पष्ट करताना प्रत्येक रानभाजीची वैशिष्ट्ये व उपयोग समजून घेणे आवश्यक असल्याचे सांगितले. रानभाजी तयार करताना योग्य पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत महत्त्वाचे असून, कोणतीही भाजी तिची योग्य ओळख पटवून आणि शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया करूनच सेवन करावी, असे त्यांनी सांगितले.

रोटरी क्लबच्या वतीने रो. श्री. समीर संचेती यांनी संस्थेमार्फत राबविण्यात आलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. रानभाज्यांचे महत्त्व नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने यावेळी विशेष पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच महोत्सवात सहभागी झालेल्या शेतकरी व आदिवासी बांधवांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. महोत्सवात महात्मा फुले शेतकरी गट, बळीराजा शेतकरी गट, अभिनव शेतकरी गट, श्री नवचैतन्य शेतकरी गट तसेच हेलगे, पारखेड, जनुना, सलाईबन, पिंपळगाव राजा आदी भागातील शेतकरी व आदिवासी बांधवांनी विविध प्रकारच्या रानभाज्यांचे प्रदर्शन मांडले. याशिवाय जिल्ह्यातील तसेच अकोला जिल्ह्यातून आलेल्या आदिवासी शेतकरी बांधवांनीही पारंपरिक रानभाज्या महोत्सवात आणल्या. महिला शेतकरी बचत गटांच्या माध्यमातून रानभाज्यांपासून तयार करण्यात आलेले विविध पारंपरिक खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारण्यात आले होते. खामगाव शहरातील नागरिकांनी या स्टॉलला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पारंपरिक रानभाज्यांचा व खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. पारंपरिक आहार, स्थानिक जैवविविधता आणि शेतकरी-आदिवासी बांधवांच्या ज्ञानाचा वारसा जतन करण्यासोबतच रानभाज्यांना बाजारपेठ व व्यापक ओळख मिळवून देण्याच्या दृष्टीने हा महोत्सव महत्त्वपूर्ण ठरला.

# तांदुळवाडी येथे निंबाच्या झाडाला गळफास लावून आत्महत्या

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**मलकापुर :** तालुक्यातील तांदुळवाडी शिवारात एका व्यक्तीने शेताच्या बांधावरील निंबाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने फाशी घेऊन आत्महत्या केल्याची घटना २२ ऑगस्ट रोजी उघडकीस आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुरुषोत्तम दिनू पाटील यांच्या तांदुळवाडी येथील शेताच्या बांधावर असलेल्या निंबाच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने बाबुभाई उर्फ बाबुलाल रमेश करवरिया रा.तांदुळवाडी ता.मलकापूर यांनी फाशी घेतल्याचे २२ ऑगस्ट रोजी १२.१५ वा. पुर्वी आढळून आले. याप्रकरणी गणेश उत्तम चिमकर (वय ४०) रा.तांदुळवाडी यांनी पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर दसरखेड एमआयडीसी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करीत याप्रकरणी कायमी मर्ग क्र. १५/२०२६, कलम १९४ बीएनएसएस अन्वये नोंद करण्यात आली आहे. घटनेचा पुढील तपास एएसआय विजय टेकाळे करीत आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड



सोमवार , दि.२४ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com


# ऑक्टोबरपर्यंत शिधावाटप दुकानांमध्ये नाही मिळणार गहू

## तीन महिने मिळणार केवळ ज्वारी, अनेकांचा ज्वारी विकण्याकडे कल

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला:** शिधावाटप दुकानांमध्ये आता गव्हाऐवजी ज्वारीचे वाटप सुरू आहे. ऑगस्ट ते ऑक्टोबर या सलग तीन महिन्यांसाठी गव्हाचे वाटप पूर्णपणे थांबवून त्याऐवजी ज्वारीचे वाटप करणे सुरू झाले आहे.

जिल्ह्यातील बहुतांश नागरिक रोजच्या आहारात ज्वारीचा समावेश करत नाहीत, याची पुरवठा विभागाला पूर्ण जाणीव आहे. असे असूनही, केवळ एका महिन्याऐवजी तीन महिन्यांसाठी शिधावाटपात ज्वारी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लोक पशुपालकांना ज्वारी खूप कमी किमतीत विकतात. परिणामी, गरिबांसाठी असलेला शिधा जनावरांच्या खाद्यासाठी वापरला जातो.

साधारणपणे, प्राधान्य कुटुंबांतील लाभार्थ्यांना प्रति व्यक्ती ३ किलो तांदूळ आणि २ किलो गहू दिला जातो. अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत, प्रत्येक शिधापत्रिकेमागे २० किलो तांदूळ आणि १५ किलो गव्हाची तरतूद आहे. मात्र, आता तीन महिन्यांसाठी गव्हाचे वितरण



### इथेनॉल साठी शहरात तांदूळ व ज्वारीची विक्री जोरात

»शहरातील शिधावाटप दुकानात मिळणारे धान्य अनेक नागरिक विकत आहेत शिधावाटप दुकानात धान्य मिळण्यास सुरुवात झाल्याबरोबर शहरात "तांदूळ आहे का तांदूळ" अशी विचारणा करीत अनेक विक्रेते आपल्या गाड्या घेऊन फिरतात 18 ते 20 रुपये किलोने हे विक्रेते लाभार्थ्यांकडून तांदूळ व ज्वारी विकत घेत ते इथेनॉल कंपन्यांना विकत असल्याची माहिती मिळत आहे

पूर्णपणे थांबवण्यात आले आहे.

सध्या जिल्ह्यात अंत्योदय अन्न योजनेअंतर्गत 46,098 शिधापत्रिकाधारक आहेत. प्राधान्य कुटुंब योजनेअंतर्गत 289758 लाभार्थ्यांची 1153916 शिधापत्रिका नोंदणीकृत आहेत. एकूण 13.19 लाख लाभार्थी शिधापत्रिकेवर मिळणाऱ्या धान्याचा लाभ घेत आहेत.

आधी तीन महिन्याचे धान्य एकाच वेळेस देण्याची घोषणा पुरवठा विभागाने केली होती परंतु केवळ एकाच महिन्याचे धान्य लाभार्थ्यांना दिले जात आहे.



# दुसऱ्या श्रावण सोमवारी राजराजेश्वराला जलाभिषेक

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला:** हर बोला महादेवच्या मंगल घोषात दुसऱ्या श्रावण सोमवारी अकोला शहराचे आराध्य राजराजेश्वराला जलाभिषेक करण्यात आला. शिवभक्त कावडीने वाघोली येथील पूर्णा नदीतील पवित्र जल आणून शिवाला जलाभिषेक करतात.

मोठ्या कावडी आज दिसून आल्या. रविवारी रात्री वाघोली कडे शहरातील शिवभक्त प्रस्थान करतात आणि सोमवारी पहाटे पासून पवित्र जल कावडीने आणून राजेश्वराला अभिषेक केला.

राजेश्वर मंदिरात सकाळ पासून भाविकांची गर्दी झाली होती. तसेच भाविकांना प्रसाद वितरण करण्यात आले.



# कमळगंगा पुलावरील अपघातात दांपत्य ठार

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वर खरबडी गावाजवळील कमळगंगा नदीच्या पुलावर रविवारी पहाटे भरधाव इनोव्हा कार पुलावरील डिव्हायडरला जोरदार धडकली. अपघातात नागपूर येथील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. पतीचा मृत्यू रुग्णालयात दाखल करताच झाला, तर पत्नीने उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. या घटनेत कारचालक गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी अकोला येथे हलवले आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटे ३.४७ वाजता डायल ११२ वर खरबडी गावाजवळील कमळगंगा नदीच्या पुलावर अपघात झाल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अमरावतीकडून मूर्तिजापूरच्या दिशेने येणारी एमएच ४९ एएस ०६७५ क्रमांकाची इनोव्हा पुलावरील डिव्हायडरला धडकलेली आढळून आली.

# युवकाची प्राणघातक हल्ला करून हत्या!

## आंबेडकर नगरात रक्तरंजित थरार, तीन युवकांना केली अटक

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला :** सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या हद्दीत के. एम. असगर हुसैन कॉलेज व स्कूलजवळील आंबेडकर नगर परिसरात युवकावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने खळबळ उडाली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या मुन्ना श्रीराम जाधव याला पोलिसांनी तातडीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.घटनेची माहिती मिळताच सिव्हिल लाईन पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक तपासात मुन्ना जाधव यांच्यावर तिघांनी हल्ला केल्याची माहिती समोर आली. तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी अनिकेत उर्फ रोहन संतोष दामोदर, अंशू शिरसाट आणि सागर उर्फ ऋषभ पल्लिवाल या तिघांना ताब्यात घेत अटक केली. घटना घडण्यापूर्वी मृतक मुन्ना जाधव आणि आरोपींमध्ये वाद झाल्याची माहिती त्यांच्या कुटुंबीयांनी दिली आहे. या वादातूनच हल्ला झाला का, हल्ल्याचे नेमके कारण काय आणि घटनेमागे अन्य काही कारण आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

दरम्यान, अटक केलेल्या तिन्ही आरोपींची चौकशी सुरू असून त्यांच्यावर यापूर्वी काही गुन्हे दाखल आहेत का, याचीही पोलिसांकडून पडताळणी केली जात आहे. हल्ल्यात नेमके कोणते हत्यार वापरण्यात आले, घटनेत आणखी कोणी सहभागी होते का, याचाही तपास केला जात आहे. या घटनेमुळे आंबेडकर नगर परिसरात खळबळ उडाली असून, प्रकरणाचा पुढील तपास सिव्हिल लाईन पोलीस करीत आहेत.

# मृद व जलसंवर्धन रिल स्पर्धेला मुदतवाढ

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला :** मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी यापूर्वी १९ ऑगस्टपर्यंत रील्स अपलोड करण्याची मुदत निश्चित करण्यात आली होती. मात्र, क्षेत्रीय स्तरावर या स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि रील्स तयार करून अपलोड करण्यासाठी स्पर्धेला ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्याचा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

# राजराजेश्वर मंदिर संस्थानकडून 3 क्विंटल महाप्रसादाचे वितरण



प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला :** श्रावण शुक्लपक्षातील पुत्रदा एकादशी तसेच श्रावणातील दुसऱ्या सोमवारीच्या पर्वानिमित्त श्री राजराजेश्वर महाराजांच्या दर्शनासाठी मंदिरात आलेल्या भाविकांना राजराजेश्वर मंदिर संस्थानच्या वतीने ३ क्विंटल उसळ फराळ महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. शेकडो भाविकांनी भक्तिभावाने महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिर संस्थानच्या या सेवाभावी उपक्रमाचे भाविकांनी तोंडभरून कौतुक केले.

# पुत्रदा एकादशीनिमित्त शहरात निघाली भव्य निशाण यात्रा

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला :** पुत्रदा एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री श्याम भक्तांच्या वतीने शहरात भव्य निशाण यात्रेचे आयोजन करण्यात आले. शेकडो श्याम भक्तांनी हातात निशाण धारण करून 'जय श्री श्याम'च्या जयघोषात भक्तिमय वातावरणात या यात्रेत सहभाग घेतला.



श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा मंदिराच्या वतीने शुक्ल पक्षातील एकादशीला नियमितपणे निशाण यात्रेचे आयोजन केले जाते. यंदा पुत्रदा एकादशीनिमित्त श्री राणी सती धाम येथून निशाण यात्रेला प्रारंभ झाला. तहसील कार्यालय, गांधी चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर, शासकीय बगीचा, अनिकट मार्गे ही यात्रा गीतानगर येथील श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा मंदिरात पोहोचली. याठिकाणी श्यामप्रेमींनी आपले मनोरथ

# बंद प्लास्टीकच्या गोदामाला भीषण आग

**अकोला :** एमआयडीसी क्र.२ परिसरातील बंद असलेल्या प्लास्टीकच्या गोदामाला रविवारी रात्री अचानक भीषण आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने गोदामातील साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. आगीची माहिती मिळताच एमआयडीसी पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.

# ॲपेक्स डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर'चा शानदार इफ्तताह!



प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला:** अकोलेकरांच्या खिदमत मध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा पुरवण्यासाठी 'ॲपेक्स डायग्नोस्टिक अँड इमेजिंग सेंटर' चा भव्य आणि रोनकदार उद्घाटन सोहळा रविवारी (२३ ऑगस्ट) अत्यंत उत्साहात संपन्न झाला. दीपक चौक येथे आयोजित या जलशामध्ये शहरातल्या अनेक प्रतिष्ठित शक्सियत आणि डॉक्टरांनी हजेरी लावली होती.

या खास सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून अकोला पश्चिमचे आमदार साजिद खान पठाण, माजी राज्यमंत्री अझहर हुसेन आणि अंजुमन-इ-इस्लाम (मुंबई) चे अध्यक्ष डॉ. झहीर काझी (पद्मश्री) हे प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांनी रिबीन कापून इमेजिंग सेंटर चे शानदार इफ्तताह केला आणि एम बी बी एस, एम डी., रेडिओडायगोनसिस असलेले डॉ. मदीहा सदफ तसेच डॉ. फहाद खान व संपूर्ण खान परिवाराला या नवीन सुरुवातीसाठी मनापासून शुभेच्छा दिल्या या रुग्णालयामुळे शहरातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध होणार असल्याचे बोलले जात आहे.

### आधुनिक सहुलियत एकाच छताखाली

या सेंटरमध्ये रुग्णांच्या तपासासाठी अत्यंत अत्याधुनिक मशीनरी बसवण्यात आली आहे. यामध्ये थ्री डी, फोर डी, फाईव्ह डी सोनोग्राफी, कलर डॉप्लर , फिटल अँड ऑब्स्टेट्रिक इमेजिंग, डिजिटल एक्स-रे आणि यु एस जी गायडेड प्रोसिजर यासारख्या अद्ययावत सुविधा रुग्णांना वाजवी दरात आणि सहुलियतीसह उपलब्ध होणार आहेत. या उदघाटन सोहळ्यात डॉ. मदीहा सदफ आणि डॉ. फहाद खान यांनी उपस्थितांचे मनापासून शुक्रिया केले. अकोल्यातील रुग्णांना उच्च दर्जाची वैद्यकीय सेवा देण्याचा संकल्प व्यक्त केला. या सोहळ्याला अकोल्यातील नागरिक, डॉक्टर आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अकोला-खंडवा रेल्वे मार्गाचे काम अंतिम टप्प्यात : खासदार अनुप धोत्रे

## आदिवासी पट्टा आणि दहा राज्यांना जोडणारा प्रकल्प

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोला:** अकोला-खंडवा रेल्वे ब्रॉडगेज परिवर्तन हा केवळ रेल्वे मार्ग नसून मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि आदिवासी पट्ट्याला मध्य प्रदेशसह देशातील दहा राज्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. हा प्रकल्प आता पूर्णत्वाच्या दिशेने अंतिम टप्प्यात आला आहे. खासदार अनुप धोत्रे यांनी माहिती देताना सांगितले की, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने विशेष सहकार्य केले आहे. या प्रकल्पासाठी लागणारा भरघोस निधी उपलब्ध करून देण्यात आला असून, जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारने आणि रेल्वे मंत्रालयाने मोलाचे सहकार्य केले आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती:

अकोला - अकोट दरम्यान ४३ किमी काम १००% पूर्ण, रेल्वे सेवा सुरु, विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर. खंडवा - आमला खुर्द ५४ किमी काम पूर्ण, तापी नदीवरील सर्वात मोठ्या पुलाचे काम पूर्ण, मालगाडीचा लोड टेस्ट यशस्वी. सर्वात कठीण टप्पा - नवीन अलाइनमेंटअकोट-हिवरखेड -सोनाळा, जळगाव जामोद-तुकईथड-आमला खुर्द येथे डोंगर पोखरून ६.७ किमी लांबीच्या जुळ्या बोगद्यांचे काम युद्धपातळीवर सुरु आहे.

६०% पेक्षा जास्त काम पूर्ण झाले असून उर्वरित ट्रॅक टाकणे, पूल, माती भराव आणि नवीन स्टेशन इमारतींचे काम वेगात सुरु आहे.



हा मार्ग सुरु झाल्यावर आदिवासी भागाच्या विकासाला मोठी गती मिळेल, असे खासदार अनुप धोत्रे यांनी सांगितले.

# राज्य महोत्सव गणेशोत्सवाच्या स्पर्धेत सहभाग घ्यावा

**अकोला :** महाराष्ट्र शासनाने राज्यातील सार्वजनिक गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला असून, या अंतर्गत 'उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा' आता तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित करण्यात येणार आहे. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार या भव्य स्पर्धेची घोषणा करण्यात आली आहे.या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक आणि पात्र मंडळांनी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या ganeshostav.pldmka.co.in या पोर्टलद्वारे विहित वेळेत दि. ७ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज ऑनलाईन सादर करावयाचा आहे.

# नगराध्यक्षांच्या घराच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह; नगरपरिषदेने मागविली कागदपत्रे

प्रतिनिधी २४ ऑगस्ट

**अकोट** : प्रतिनिधी

अकोटच्या नगराध्यक्षा सौ. माया विवेक धुळे यांच्या यशोदा नगर, रामटेकपुरा येथील निवासी घराच्या कथित अनधिकृत बांधकामाबाबत करण्यात आलेल्या तक्रारीची नगरपरिषद प्रशासनाने दखल घेतली आहे. संबंधित बांधकामाची चौकशी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश नगरपरिषदेने माया धुळे यांना दिले आहेत.

भूमी फाऊंडेशन, विदर्भचे अध्यक्ष चंचल सुनील पितांबरवाले यांनी ६ ऑगस्ट २०२६ रोजी नगरपरिषदेकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने नगरपरिषदेच्या नगररचना विभागाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी माया धुळे यांना पत्र पाठविले आहे.नगरपरिषदेच्या पत्रात संबंधित निवासी घराच्या अनधिकृत बांधकामाबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीची विहित प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वस्तुस्थितीची पडताळणी करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.यासाठी संबंधित बांधकामाची मंजूर बांधकाम परवानगी व मंजूर नकाशा, मालकी हक्कासंबंधी कागदपत्रे तसेच बांधकाम पूर्णत्व/भोगवटा प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. संबंधित कागदपत्रे हे पत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत नगरपरिषद कार्यालयात सादर करावीत, असे पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

निर्धारित मुदतीत कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील चौकशी करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने म्हटले आहे. तसेच आवश्यक कागदपत्रे सादर न झाल्यास महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत पुढील कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135